बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०

साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१३ गोंदिया | अंक ४६ | बुधवार, दि.२३ ऑक्टोबर २०२४ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024



गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध

## चकमकीत पाच नक्षल्यांना कंठस्नान, पोलिसांनी घातपाताचा मोठा कट उधळला



**गडचिरोली :** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नक्षल्यांचा घातपाताचा डाव उधळून लावण्यात गडचिरोली पोलिसांना २१ ऑक्टोबरला यश आले. छत्तीसगड सीमेवरील कोपर्शी जंगलात नक्षलवादी व जवानांत झालेल्या जोरदार चकमकीत पाच नक्षल्यांना पोलिसांनी कंठस्नान घातले. चकमकीत एक जवान जखमी झाला असून त्याच्यावर उपचार सुरु आहेत.

छत्तीसगड सीमेवरील भामरागड तालुक्यातील कोपर्शी जंगलात पोलीस आणि नक्षलवाद्यांमध्ये २१ ऑक्टोबरला पहाटे चकमक सुरु झाली. नक्षलविरोधी अभियान राबवित असताना नक्षलवाद्यांनी जवानांच्या दिशेने गोळीबार केला. यावेळी जवानांनीही जोरदार प्रत्युत्तर दिले. यात पाच नक्षल्यांचा खात्मा करण्यात जवानांना यश आले. दोन वेगवेगळ्या ठिकाणी ही चकमक झाली. यावेळी एक जवानही जखमी झाला आहे. जखमी जवानाला हेलिकॉप्टरने गडचिरोलीत आणले. त्याच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरु आहेत. दरम्यान, मृत पाच नक्षलवाद्यांचे मृतदेह देखील गडचिरोली येथे आणले आहेत. त्यांची ओळख पटविण्याचे काम उशिरापर्यंत सुरु होते.

गडचिरोली पोलिसांनी नक्षलवादविरोधी अभियान प्रभावीपणे राबविल्यामुळे नक्षल्यांना जबर हादरा बसला आहे. अनेक जहाल नक्षलवादी चकमकीत ठार झाले तर काहींनी शरणागती पत्करली. त्यामुळे माओवादी चळवळ खिळखिळी झाली आहे. विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने नक्षलवादी घातपात करु शकतात, ही शक्यता गृहित धरुन पोलीस सतर्क आहेत.

### घनदाट जंगलात आश्रय

**नक्षलवाद्यांविरुध्द महाराष्ट्रासह छत्तीसगड पोलिसांनीही आक्रमकपणे मोहीम राबविण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे नक्षली सैरभैर झाले आहेत. संघटनेचे नेतृत्व करणाऱ्या काहींना अटक झाली तर काही चकमकीत ठार झाले. त्यामुळे ही चळवळ आता नेतृत्वहीन होत आहे. या पार्श्वभूमीवर छत्तीसगडमधील नक्षली सीमावर्ती भागातील घनदाट जंगलाचा आश्रय घेऊन गडचिरोलीत घुसखोरी करत असल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले.**

**कोपर्शी जंगलात पहाटे सहा वाजेपासून जवान व नक्षल्यांत चकमक सुरु झाली. दुपारी ४ वाजेपर्यंत ही चकमक सुरुच होती. त्यानंतर पोलिसांनी शोधमोहीम सुरु केली आहे. परिसरात झडती घेतल्यानंतर आतापर्यंत पाच नक्षल्यांचे मृतदेह आढळून आले आहेत. यात मृत नक्षल्यांची संख्या वाढू शकते, असा पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे.**

### मोठा फौजफाटा तैनात

**या घटनेनंतर पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांनी अपर अधीक्षक यतीश देशमुख, एम.रमेश यांच्या नेतृत्वात सी -६० पथकाच्या २२ तुकड्या व सीआरपीएफच्या शीघ्रकृती दलाच्या दोन तुकड्या या कोपर्शी जंगलात पाठविण्यात आल्या. जंगलात दोन वेगवेगळ्या ठिकाणी माओवाद विरोधी अभियान राबविण्यात येत असल्याची माहिती पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांनी दिली.**

## माजी मंत्री बडोलेंचा राष्ट्रवादीत प्रवेश, चंद्रिकापूरेंचे काय



गोंदिया– गेल्या काही दिवसांपासून उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या राष्ट्रवादीत इनकमिंग सुरु झाले आहे. उमेदवारी मिळवण्यासाठी अनेकांनी अजित पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केल्याचे चित्र होते.आता अजित पवारांनी भाजपच्या बड्या नेत्याला गळाला लावले.माजी मंत्री राजकुमार बडोले यांनी अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे.त्यामुळे अजित पवारांना विदर्भात मोठे बळ मिळणार आहे.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गोंदिया जिल्ह्यात राष्ट्रवादीला बळ मिळणार आहे.राजकुमार बडोले यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार, राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि राष्ट्रवादीचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांच्या उपस्थितीत पक्षात प्रवेश केला.

बडोलेंच्या प्रवेशामुळे विद्यमान आमदार मनोहर चंद्रिकापूरेंचे काय होणार ते कुठली भूमिका घेतात याकडेही मतदारांचे लक्ष लागले आहे.

बडोले यांच्यासारख्या अनुभवी नेत्याचा पक्षात समावेश केल्यास पक्षाची स्थिती मजबूत होईल, असे अजित पवार म्हणाले.अर्जुनी मोरगाव विधानसभा मतदारसंघाचे दोनवेळा आमदार म्हणून प्रतिनिधित्व केलेले राजकुमार बडोले यांचा गोंदिया जिल्ह्यातच नव्हे तर महाराष्ट्रातील मागास समाजात मोठा प्रभाव आहे. त्यांच्या राष्ट्रवादी प्रवेशामुळे या महत्त्वाच्या भागात पक्षाची स्थिती मजबूत होणार आहे.

माजी मंत्री राजकुमार बडोले यांनी २००९ मध्ये ६९८५६ मते घेत काँग्रेसच्या रामलाल राऊत यांचा १६३०७ मतांनी पराभव केला. २०१४ मध्ये मतांची टक्केवारी कमी झाली. मात्र प्रतिस्पर्धी काँग्रेसचे उमेदवार राजेश नंदागवळी यांचा ३०२९५ इतक्या भरघोस मतांनी पराभव केला. अन राज्याच्या सामाजिक न्याय मंत्रीपदी त्यांची वर्णी लागली.मात्र निवडणुकीच्या शेवटच्या सहा महिन्यापुर्वी भाजपने त्यांचे मंत्रीपद काढून फडणविसांचे खास सारथी असलेले डॉ.परिणय फुके यांना मंत्री बनविल्याने समाजात मोठी नाराजी निर्माण झाली होती.

त्यांच्या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचं इंग्लंड येथील घर घेण्यात बडोले यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती.तसेच पहिल्यांदा सामाजिक न्यायविभाग राज्यातील कानाकोपऱ्यात पोचला गेला होता.

मात्र, २०१९ च्या निवडणुकीत राष्ट्रवादीचे आमदार मनोहर चंद्रिकापुरे यांच्याकडून राजकुमार बडोले यांना केवळ ७१८ मतांनी निसटता पराभव भाजपच्याच काही लोकामुळे स्वीकारावा लागला होता.त्यानंतरही त्यांनी मतदारसंघात मतदारसोबतचा संपर्क कायम ठेवला होता.पक्षाकडून उमेदवारी मिळाल्यास रिंगणात उतरण्याची तयारीही केली होती.मात्र अजित पवार यांची राष्ट्रवादी महायुतीमध्ये सहभागी झाल्याने अर्जुनी मोरगाव मतदारसंघ हा विद्यमान आमदार ज्यांच्या त्यांची जागा यानुसार ही जागा राष्ट्रवादी काँग्रेसला असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर बडोले यांनी भाजपच्या वरिष्ठांशी चर्चा केल्यानंतरच महायुतीचा भाग असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश घेण्याचा निर्णय घेतला.आता २०२४ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी राष्ट्रवादी अजित पवार गट हा भाजपसोबत आल्याने मोरगाव अर्जुनी विधानसभेची उमेदवारी कोणाला मिळणार हे प्रश्नचिन्ह असतानाच राजकुमार बडोले यांनी आज मुंबई येथे अजित पवार गटात प्रवेश केला आहे. तर दुसरीकडे राष्ट्रवादीचे विद्यमान आमदार असल्याने आता इथली उमेदवारी कोणाकडे जाते हे पाहणे महत्त्वाचे असेल.

**अजित पवार काय काय म्हणाले?**

अजित पवार म्हणाले, माजी मंत्री राजकुमार बडोले यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेशाचा कार्यक्रम प्रदेश कार्यालयात पार पडला.राजकुमार बडोलेंसारखा एक अनुभवी आणि जनसामान्यांसाठी आवाज उठवणारा नेता पक्षात सामील झाल्याने पक्षाची ताकद नक्कीच वाढली आहे, याचा आम्हाला आनंद आहे. त्यांचं मी मनापासून स्वागत करतो आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देतो असे म्हणाले.

## भूसपांदनामुळे कवलेवाडामार्गावरील रेल्वे पुलाचे काम रखडले



**गोंदिया–**जिल्ह्यातून जात असलेल्या मुंबई–हावडा रेल्वेमार्गावर तिरोडा येथे महारेलच्यावतीने रेल्वे उड्डाणपुलाचे बांधकाम हाती घेण्यात आले आहे.गेल्या एक दिड वर्षापासून हे काम सुरु असून जनतेला तिरोड्यातील दोन्ही रेल्वेपूल खुले होण्याकरीता अजून मार्च महिन्यापर्यंतची वाट बघावी लागणार असल्याचे समोर आले आहे.विकासाच्या नावावर मोठमोठे नेते येऊन भूमिपुजन करुन गेले असले तरी विशेष म्हणजे तिरोडा रेल्वेस्थानकाशेजारील कवलेवाडा मार्गाला जोडणार्या उत्तरेकडील उड्डाणपुलाचे अर्धवट बांधकाम झाले असून उर्वरित बांधकाम मात्र भूसपांदनाच्या अडचणीमुळे रखडल्याचे चित्र आहे.उत्तरेकडील शेतजमीन मालकांनी जिल्हाधिकारी यांनी ठरविलेल्या दरात जमिन देण्यास नकार दिल्याने भूसंपादनाची प्रकिया थांबली.आता भूसंपादनाच्या खोडयामुळे प्रकल्प आणखी काही वर्षांसाठी रखडण्याची शक्यता वर्तविली जात आहेत.

तिरोडा रेल्वे स्थानकाजवळ रेल्वे पूल नसल्याने फ्फाटकातून वाहतूक करणाऱ्या वाहनांमुळे दररोज मध्य रेल्वेच्या जलद आणि मालवाहक गाड्यावर त्याचा परिणाम होतो. तसेच फ्फाटक ओलांडताना रेल्वेगाडयांच्या धडकेत अनेकांना जीव गमवावा लागला आहे.गेल्या दोन वर्षांपूर्वी या पुलाचे काम सुरू करण्यात आले.मात्र उत्तरेकडील भूसंपादनाचा पेच कायम आहे. येथील नागरिकांकडून शेतजमीन जागेच्या मोबदल्याची मागणी अधिकची असल्याने उत्तरेकडी पूलाचे बांधकाम रखडले गेले आहे.

उत्तरेकडील पूलाच्या बांधकामाकरीता शेतजमिन असलेल्या मालकासोंबत चर्चा झाली असून शासनाने दिलेले दर नाकारल्याने बंधणकारक दर निश्चित करुन जमिन सपांदनाची प्रकिया येत्या आचारसंहिता संपल्यानंतर करण्यात येणार आहे.ती प्रकिया होताच पुलाच्या बांधकामाला सुरवात करण्यात येणार असून संपादित भागात ५ पिल्लर उभे करण्यात येणार आहेत.हा सरळ पूल उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर उतरणा असल्याची माहिती महारेलचे अभियंते.श्री.शर्मा यांनी दिली.

## विधानसभा निवडणूकीसाठी ७९ अर्जाची उचल

**गोंदिया:** विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी गोंदिया जिल्ह्यात २२ ऑक्टोंबर रोजी एकुण ७९ अर्जांची उचल करण्यात आली असून आज एकही उमेदवाराने नामनिर्देशनपत्र दाखल केले नाही. ६३–अर्जुनी मोरगाव, ६४– तिरोडा, ६५–गोंदिया, ६६–आमगाव या विधानसभा क्षेत्रामध्ये आजपासुन अर्ज स्विकारण्यास सुरूवात झाली. सकाळी ११ ते दुपारी ३ यावेळेत उमेदवारांना नामनिर्देशन पत्र सादर करायचे आहे. ६३–अर्जुनी मोरगाव विधानसभा क्षेत्रामध्ये आज २५ अर्जाची उचल करण्यात आली. ६४–तिरोडा विधानसभा क्षेत्रामध्ये आज २३ अर्जांची उचल करण्यात आली. ६५–गोंदिया विधानसभा क्षेत्रामध्ये आज १६ अर्जाची उचल करण्यात आली व ६६–आमगाव विधानसभा क्षेत्रामध्ये आज १५ अर्जाची उचल करण्यात आली.

## हमारा क्या 'कसूर' म्हणत बहुजन चेहरा बिघडवणार गणित!





**गोंदिया :** गोंदिया विधानसभा क्षेत्रात निर्माण झालेली राजकिय परिस्थिती दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. कोणत्याही परिस्थितीत बहुजनांचे नेतृत्व हवे, असा मानस तयार होत असल्याने एखाद्या पक्षातून विद्रोह झाल्यास त्याचा फटका महायुती व महाविकास आघाडीच्या उमेदवारावर पडणार असल्याचे जाणकारांचे मत आहे. परिणामी २०१९ च्या निवडणूकीत माझा काय कसूर या शब्दाला घेत अपक्ष निवडूणक रिंगणात उतरलेले विनोद अग्रवाल हे यावेळी भाजपचे अधिकृत उमेदवार झाले आहेत.त्यातच आता भाजप महायुतीमधील नेत्यांनीही या निवडणूकीत या आमचा काय कसूर या शब्दांचा पुनरुच्चार करायला सुरवात केल्याने राजकीय खळबळ माजणार आहे.

विशेष म्हणजे भारतीय जनता पक्षाचे किसान आघाडीचे जिल्हा अध्यक्ष व जिल्हा परिषदेचे बांधकाम सभापती संजय टेंभरे यांनी पक्षाचा प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा देत निवडणूकीच्या रिंगणात उतरण्याच्या तयारीला सुरवात केली आहे.तर दुसरीकडे अपक्ष जिल्हा परिषद सदस्य व जिल्हा परिषदेचे कृषी व पशुसंवर्धन सभापती सोनू(रुपेश)कुथे यांनीही निवडणूकीच्या रिंगणात उतरण्याकरीता प्रचाराला सुरवात केली आहे.या दोन्हीपैकी एखादा बहुजन चेहरा रिंगणात राहिल्यास गोंदिया विधानसभा मतदारसंघातील निवडणूक अत्यंच चुरशीची होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

राज्यात विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजले आहे. त्यातच महायुती व महाविकास आघाडी या दोन्ही आघाड्यांचे उमदेवार जवळपास निश्चित झाले आहेत. महायुतीकडून विद्यमान आमदार विनोद अग्रवाल तर महाविकास आघाडीकडून माजी आमदार गोपालदास अग्रवाल हे निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहेत.

मात्र सन २०१९ च्या निवडणुकीत या दोन्ही दिग्गजांनी आपआपल्या पक्षाला रामराम ठोकत निवडणूक लढविली. परिणामी या ५ वर्षाच्या कार्यकाळात बहुजन नेत्यांनीच भाजप व काँग्रेसला सांभाळले. मात्र अच्छे दिन येताच बहुजनांना डावलून पुन्हा त्याच नेत्यांना उमेदवारी देण्यात येत असल्याने एखाद्या पक्षातील नेता हा बहुजन चेहरा म्हणून निवडणुकीत उडी घेणार असल्याचे चित्र दिसून येत आहे.

अपक्षामुळे कुणाचे गणित बिघडणार? असा प्रश्न सामान्य मतदारासमोर पडणार पडला आहे. गोंदिया विधानसभेला यावेळी काँग्रेस व भाजपकडून बहुजन उमेदवार राहणार असे सांगण्यात येत होते.मात्र नागपूरच्या एका ओबीसी नेत्यामुळे भाजपच्या बहुजन उमेदवारांच्या पदरात निराशा पडल्याने नाराजी दिसून येत आहे.तीच परिस्थिती काँग्रेसमध्येही आहे.काँग्रेसमधील बहुजन नेते जरी शांत असले तरी भाजपातील बहुजन नेत्यांमध्ये आक्रोश खदखदत आहे. परिणामी एखाद्याचे पदाधिकारी बंडखोरी करीत निवडणुकीच्या रिंगणात उडी घेतल्यास समीकरण बिघडण्याचे चिन्हे निर्माण होण्याची शक्यता आहे.

## आमगाव मतदारसंघात भाजप ८ तर ४ वेळा विजयी

**गोंदिया:** आमगाव–देवरी विधानसभा मतदारसंघात आजपर्यंत झालेल्या १३ सार्वत्रिक निवडणूकीत ८ वेळा भाजप तर ४ वेळा काँग्रेस विजयी ठरली आहे.या मतदारसंघातून भाजपचे जेष्ठ नेते माजी मंत्री प्रा.महादेवराव शिवणकर यांनी विजयाची हॅट्रिक केली असून सलग तीनदा निवडून आले आहेत.आमगाव–देवरी हा मतदार संघ भाजपचा बालेकिल्ला राहिला असून अनुसूचित जमातीकरीता गेल्या तीन निवडणूकापासून आरक्षित आहे.सन १९६२ पासून २०१९ पर्यंत एकूण १३ सार्वत्रिक विधानसभा निवडणुका झाल्या यामधे तब्बल ८ वेळा भाजपचे उमेदवारांनी विजयाचा झेंडा रोवला आहे. तर फक्त चार निवडणुकीत कांग्रेसच्या उमेदवारांनी विजय प्राप्त करता आले. असे असले तरी २०१९ मध्ये भाजपच्या किल्ला भेदून काँग्रेसने आमगाव आपल्या ताब्यात घेतले आहे, त्यामुळे या किल्लयाला पुन्हा खेचून आणण्यासाठी भाजपला चागंले शर्थीचे प्रयत्न करावे लागणार आहे.

हा विधानसभा क्षेत्र जनसंघ भाजपचा पायंडा रचणारा असून स्व.लक्ष्मणराव मानकर, प्रा.महादेवराव शिवणकर या सारखे दिग्गज नेते या क्षेत्राने दिले आहेत. त्यांच्या संघटनात्मक कामगिरीमुळेच हा विधानसभा क्षेत्र भाजपचा बालेकिल्ला मानला जातो.

## आमगाव-देवरी मतदारसंघात पुरामांची मक्तेदारी!

### भाजप कार्यकर्त्यांमध्ये नाराजीपूर्ण कुजबूज



**देवरी:** आमगाव–देवरी विधानसभा क्षेत्राचे महायुतीकडून चित्र स्पष्ट झाले आहे. भाजपने माजी आमदार संजय पुराम यांच्यावर विश्वास दर्शवून तिसऱ्यांदा उमेदवारी दिली आहे. मात्र या उमेदवारीला घेवून भाजपच्या कार्यकर्त्यांमध्ये नाराजीपूर्ण कुजबूज झाली आहे.

भाजपच्या पक्ष श्रेष्ठीकडून एकाच कुटूंबावर ऐवढी मेहरबानी का? असा सवाल भाजप कार्यकर्त्यांकडून उपस्थित केला जात आहे. विधानसभेत तेच आणि जिल्हा परिषदेतही त्यांच्या कुटूंब तर मग इतर प्रामाणिक पदाधिकाऱ्यांनी पक्ष पक्षाचेन आदेश ऐकावे का? असा संताप देखील कार्यकर्त्यांकडून व्यक्त केला जात आहे.

आमगाव–देवरी या विधानसभा क्षेत्रात भाजप–काँग्रेस असा सामना होणार हे निश्चित झाले आहे. भाजपने माजी आमदार संजय पुराम यांना तिसऱ्यांदा उमेदवारी दिली आहे. संजय पुराम यांनी बीएसपी व इतर संघटनात्मक प्रवास करीत १०–१२ वर्षापुर्वी भाजपचे सक्रिय सदस्यता स्विकारली. दरम्यान त्यांची पत्नी सविता पुराम यांना जिल्हा परिषदेमध्ये संधी देण्यात आली. एवढेच नव्हे तर पक्षाकडून सविता पुराम यांची जिल्हा परिषदेच्या सभापती पदावरही वर्णी लावण्यात आली. त्यातच सन २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत संधीचे सोने करुन घेण्यासाठी संजय पुराम यांना भाजपने उमेदवारी दिली. त्यात यशस्वी झाले. त्याचप्रमाणे सन २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत तत्कालीन आ.संजय पुराम यांना पक्षाकडून फेर संधी देण्यात आली. मागील विधानसभा निवडणुकीच्या पथ्यावर भाजपकडून अनेक इच्छुकांनी उमेदवारी मागितली होती. परंतु मात्र सर्वांना डावलून संजय पुराम यांना उमेदवारी देण्यात आली होती. दरम्यान पक्षाच्या निष्ठावान कार्यकर्त्यांनी चांगलीच नाराजी व्यक्त केली होती. फलस्वरूप भाजपच्या ताब्यात असलेला आमगाव–देवरी विधानसभा क्षेत्र काँग्रेसने हिसकावून घेतला. माजी आमदार संजय पुराम यांना पराभवाला समोर जाव लागले. त्यानंतर पुराम हे कुटूंब सातत्याने राजकारणात सक्रिय राहिले. त्यातून पुन्हा बक्षीस पात्र म्हणून भाजपकडून संजय पुराम यांची पत्नी सविता पुराम यांना फेर जिल्हा परिषदेमध्ये सभापती पद बहाल करण्यात आला. या निवडीला घेवूनही आमगाव,देवरी व सालेकसा एवढेच नव्हे तर गोंदिया जिल्ह्यातही भाजपच्या कार्यकर्त्यांकडून कमालीची नाराजी व्यक्त करण्यात आली होती. सन २०१४ च्या विधानसभा निवडणुकीतून पुराम या कुटूंबाला पक्ष श्रेष्ठी निश्चितपणे दूर ठेवणार, अशी आशा भाजपच्या कार्यकर्त्यांनी बाळगली होती. त्यातूनह भाजपकडून अनेक इच्छुकांनी उमेदवारी मागणी केली होती.

परंतु भाजपने जाहीर केलेल्या उमेदवारांच्या यादीमध्ये संजय पुराम यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाल्याने आमगाव विधानसभा क्षेत्रातील भाजप कार्यकर्त्यांमध्ये कमालीची नाराजी पहावयास मिळत आहे. एकाच कुटूंबावर भाजप श्रेष्ठीची एवढी मेहरबानी का? असा सवाल उपस्थित करीत भाजपचे भाजपचे कार्यकर्ते, आमच्या भाग्यात पक्ष श्रेष्ठींच्या आदेशांची अंमलबजावणी करणे आहे काय? असा उलट सवालही उपस्थित केला. त्यामुळे निवडणूक रणसंग्राम रंगण्यापुर्वीच भाजपच्या कार्यकर्त्यांमध्ये सुरु असलेला नाराजी सत्र आणखी किती स्तरापर्यंत पोहचणार, याकडे लक्ष लागले आहे. विशेष म्हणजे याच नाराजी सत्रातून २०१९ मध्ये भाजपला आमगाव गड गमवावे लागले होते.

## स्वतःच्या पत्नीला नोकरीवर लावण्याकरीता एडीएचओ गेले छानणी समितीवर, निवड प्रकियेवर प्रश्नचिन्ह



**गोंदियाः–** राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत १७ सप्टेंबरला २०२४ रोजी विविध पदाकरीता आरोग्य विभागाच्यावतीने गोंदिया जिल्हा परिषदेच्या वेबसाईटवर प्रकाशित करण्यात आलेल्या जाहिरातीच्या पदभरतीत अधिकाऱ्यानी आपल्या नातेवाईकाना नौकरीवर लावून देण्याकरीता शासकीय नियमांना तिलाजंली दिल्याचा प्रकार १४ ऑक्टोंबर रोजी उघडकीस आलेला आहे. विशेष म्हणजे ज्या अधिकार्याचे नातेवाईक मुलाखतीकरीता पात्र होत असतील त्यांच्या निवडीच्यावेळी मुलाखतीच्या पॅनलमध्ये ठेवता येत नाही. परंतु गोंदिया जिल्हा परिषदेचे आरोग्य विभागाचे अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.वाघमारे यांनी त्यांच्या पत्नी हा अर्जदार असताना त्यांची निवड करण्याकरीता मुलाखतीच्या पॅनलमध्ये आमगाव येथील तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ.राऊत यांचे नाव काढून त्याठिकाणी स्वतःजात आपल्या नातेवाईकाची(पत्नी) निवड केल्याने एकच खळबळ माजली आहे.

विशेष म्हणजे श्यामला संभाजी ढवळे यांनी अर्ज करतांना अनु.जाती व ओपन या दोन प्रवर्गातून अर्ज केले. त्यांच्या अर्जानुसार ३०.६१ टक्के गुण आणि अनुभवाचे ९ टक्के गुण निवड मंडळाने देत ३९.६१ टक्के गुण देत निवड यादीत पहिल्या क्रमांकावर दोन्ही गटात आणले. जेव्हा की कुठल्याही एका गटात त्यांची निवड करायला हवी होती.त्यांच्या दोन अर्जामुळे इतर उमेदवारावर जाणिवपुर्वक अन्याय करण्यात आल्याचे दिसून येत आहे.त्याचप्रमाणे ओपन गटात दिव्या मोरेश्वर सोनवणे हिला ३६.२८ गुण जाहिरात कायद्याच्या ५० टक्के नुसार देण्यात आले.परंतु दिव्या सोनवणे हिने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अकोला येथे अभ्यासक्रम पुर्ण केल्यानंतर केलेल्या अंप्रेटिस कार्यकाळाचे गुण मात्र निवड समितीने जाणिवपुर्वक देणे टाळल्याने ओपन गटात दिव्या सोनवणेला पहिल्या क्रमांकावर येण्यापासून व निवड होण्यापासून रोखण्यात आल्याचे स्पष्ट दिसून येत आहे.त्यामुळे या निवड प्रक्रियेची सखोल चौकशी जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पुन्हा करुन निवड प्रकिया परत करणे गरजेचे आहे.

विशेष म्हणजे ३ जागेकरीता झालेली (१ ओपन,१ अनु.जाती व १ व्हीजेएनटी) ही निवड प्रकिया १४ आँक्टोंबरला घाईघाईत करुन श्यामला ढवळे यांची नियुक्ती करुन केटीएस जिल्हा सामान्य रुग्णालयात त्यांना रुजू ही करण्यात आले. यावरुन रुजू करण्याकरीता झालेली घाई व दिव्या सोनवणे यांचे अकोला शासकीय वैद्यकीय महाविद्यालया केलेल्या कामाचे गुण देणे टाळल्याने या निवड भरतीमध्ये मोठा गैरव्यवहार झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

या निवड प्रकियेतील गोंधळाबाबत जिल्हा आरोग्य अधिकारी यांना विचारणा केली असता प्रक्रियेच्या छानणी प्रकियेत अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी यांना आपण ठेवले होते.आणि ज्यांची निवड झाली त्यांचे आडनाव वेगळे आहे.त्यातच डॉ.वाघमारे यांनी त्या उमेदवार आपल्या पत्नी असल्याची माहिती प्रशासनाला दिलेली नव्हती.जरी त्या त्यांच्या पत्नी असल्या तरी असे असले तरी ज्यांच्यावर अन्याय झालेला आहे, त्यांनी तक्रार करावी असे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.नितिन वानखेडे यांनी सांगितले.

साप्ताहिक
बेरार टाईम्स
निर्भिड, निष्पक्ष लोकप्रिय साप्ताहिक http://berartimes.com
बुधवार, दि.२३ ऑक्टोबर २०२४


# संपादकीय

## नक्षलवाद्यांविरुद्धचा लढ्याची वाट यशस्वीतेकडे

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी दोन महिन्यांपूर्वी नक्षलवाद्यांना शेवटचा इशारा दिला होता. देशाच्या विकासाच्या मुख्य प्रवाहात सामील होण्याचे आवाहन करून नक्षलवादी सामील झाले नाहीत, तर दोन वर्षांमध्ये संपवून टाकू, असे त्यांनी बजावले होते. राज्य आणि केंद्र सरकारमध्ये समन्वय असल्यास काय करता येते, याचे उदाहरण म्हणजे गडचिरोलीपासून अडीचशे किलोमीटर अंतरावर ४० नक्षलवाद्यांना यमसदनी धाडण्यात आल्याची अलीकडील घटना. त्यातच सोमवारलापण गडचिरोली पोलिसांच्या कारवाईत ५ नक्षलवाद्यांना कंठस्नान मिळाले. ही कारवाई करून सरकारने नक्षलवादाच्या विरोधातील लढाई अंतिम टप्प्यात असल्याचा संदेश दिला आहे. त्यातच ६७६ नक्षलवाद्यांनी आजपर्यंत गडचिरोली पोलिसासमोर आत्मसमर्पण केले आहे.

आज देशातील लोकशाही व्यवस्थेसमोर नक्षलवाद हे मोठे आव्हान आहे. महाराष्ट्र आणि तेलंगणामधील नक्षलवादाला बऱ्यापैकी अटकाव करण्यात यश आले असले, तरी छत्तीसगड, झारखंड राज्यात नक्षलवादी अधूनमधून डोके वर काढत असतात. एकीकडे विकास झाला नाही, अशी बोंब ठोकायची आणि दुसरीकडे विकासाचे प्रकल्प होऊ द्यायचे नाहीत, स्थानिक आदिवासींना सरकारविरोधात भडकावून द्यायचे, अशी नीती नक्षलवादी अवलंबत आहेत. आता त्यांना स्थानिकांचा पूर्वीइतका पाठिंबा राहिलेला नाही. त्यामुळे नक्षलवाद्यांचा ठावठिकाणा शोधण्यात अडचणी येत नाहीत. "सरकार या प्रदेशाच्या विकासासाठी, युवकांच्या विकासासाठी, तुमच्या कुटुंबाच्या विकासासाठी कटिबद्ध आहे; शस्त्रे सोडा आणि येथे सुरू असलेल्या विकासाच्या रथात सामील व्हा, नवीन युगाला बळ द्या', असे आवाहन शहा यांनी अलीकडे केले होते.

गेल्या काही दिवसांमध्ये अनेक नक्षलवाद्यांनी चुकीचा मार्ग सोडून विकासाची वाट निवडली असली, तरी काहीजण रक्तरंजित क्रांतीचा मार्ग सोडायला तयार नाहीत. त्यांना वठणीवर आणण्यासाठी सरकार उचलत असलेली पावले चुकीची नाहीत. संपूर्ण छत्तीसगड आणि देशाला नक्षलवादाच्या समस्येतून मुक्त करण्यासाठी दोन वर्षांचा कृती आराखडा तयार करून शहा यांनी अल्टिमेटम दिला होता. नक्षलवाद्यांनी मुख्य प्रवाहात सामील होण्यासाठी आत्मसमर्पण करावे किंवा सक्तीच्या कारवाईसाठी तयार राहावे, असा इशारा त्यांनी दिला होता. शहा आणि छत्तीसगडचे मुख्यमंत्री विष्णू देव साई यांच्या नक्षलवादाविरुद्धच्या आक्रमक भूमिकेचा परिणाम आता दिसून येत आहे. गेल्या नऊ महिन्यांमध्ये केंद्र आणि राज्य सरकारमधील उत्तम समन्वयामुळे पोलीस, निमलष्करी दल, केंद्रीय राखीव पोलीस आदींचे मनोबल वाढले असून माहिती यंत्रणा पूर्वीपेक्षा अधिक मजबूत झाली आहे. त्यामुळे राज्यात सातत्याने नक्षलवाद्यांच्या हत्या होत आहेत. नक्षलवाद्यांविषयी असलेली सामान्यांची भीती आता कमी व्हायला लागली आहे. अनेक बाबतीत तर स्थानिकांनीच यंत्रणांना नक्षलवाद्यांची माहिती दिली आहे.

नारायणपूर–दंतेवाडा जिल्ह्याच्या सीमेवर असलेल्या थुलथुली गावाजवळील जंगल आणि डोंगराळ भागात झालेल्या चकमकीत जवानांनी ४० नक्षलवादी ठार केले. गेल्या दोन तपांमधील ही सर्वात मोठी कारवाई आहे. नक्षलवाद संपवण्यासाठी सुरू झालेला लढा आता शेवटपर्यंत पोहोचल्यानंतरच संपेल, असे मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे. काही दिवसांपूर्वी यंत्रणांना दंतेवाडा जिल्ह्यातील गावडी, थुलाथुली, नेंदूर आणि रेंगावाया गावांदरम्यानच्या टेकडीवर नक्षलवाद्यांच्या उपस्थितीची माहिती मिळाली होती. त्यानंतर, "डीआरजी'आणि "स्पेशल टास्क फोर्स' (एसटीएफ) च्या जवानांची संयुक्त टीम दंतेवाडा आणि नारायणपूर जिल्ह्यातून रवाना करण्यात आली. हा भाग इंद्रावती एरिया कमिटी, पीएलजीए (पीपल्स लिबरेशन गुरिल्ला आर्मी) कंपनी क्रमांक सहा आणि माओवाद्यांची प्लाटून १६ यांचा गड मानला जातो. सुरक्षा दल परिसरात शोध मोहीम राबवत असताना नक्षलवाद्यांनी सुरक्षा दलांवर गोळीबार सुरू केला. त्याला सुरक्षा दलांनीही प्रत्युत्तर दिले. सुरक्षा दलांनी या परिसरातून एके–४७ रायफल, एसएलआर (सेल्फ–लोडिंग रायफल), इन्सास रायफल, एलएमजी रायफल आणि ३०३ रायफलसह शस्त्रांचा साठा जप्त केला आहे. या घटनेनंतर मुख्यमंत्री साई यांनी आपल्या निवासस्थानी पोलीस विभागातील उच्चस्तरीय अधिकाऱ्यांची बैठक घेतली. या बैठकीला राज्यातील वरिष्ठ पोलीस अधिकारी उपस्थित होते.

दंतेवाडा आणि नारायणपूरसह सात जिल्ह्यांचा समावेश असलेल्या बस्तर प्रदेशात या वर्षी आतापर्यंत सुरक्षा दलांनी वेगवेगळ्या चकमकींमध्ये १८५ माओवाद्यांना ठार केले आहे. यापूर्वी, १६ एप्रिल रोजी कांकेर जिल्ह्यात सुरक्षा दलांसोबत झालेल्या चकमकीमध्ये काही वरिष्ठ केडरसह २९ नक्षलवादी ठार झाले होते. छत्तीसगड, आंध्र प्रदेश, झारखंड, केरळ, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, ओडिशा, तेलंगणा आणि पश्चिम बंगाल या सात राज्यांमध्ये नक्षलवादी अधूनमधून डोके वर काढत असतात. देशातील ३८ जिल्ह्यांपैकी छत्तीसगडमधील १५ जिल्हे नक्षलग्रस्त आहेत. यामध्ये विजापूर, बस्तर, दंतेवाडा, धमतरी, गरिआबंद, कांकेर, कोंडागाव, महासमुंद, नारायणपूर, राजनंदगाव, मोहला–मानपूर–अंबागड चौकी, खैरागड छूई खान गंडई, सुकमा, कबीरधाम आणि मुंगेली या नक्षलग्रस्त जिल्ह्यांचा समावेश आहे. संपूर्ण देशात छत्तीसगडमध्ये सर्वाधिक नक्षलग्रस्त जिल्हे आहेत. हा रेड टेररचा बालेकिल्ला आहे. त्याला "रेड कॉरिडॉर' म्हणतात. मध्य पूर्व आणि दक्षिण भारतातील भाग या "रेड कॉरिडॉर'मुळे सर्वाधिक प्रभावित झाले आहेत. या भागांना नक्षलवाद्यांचा गड म्हटले जाते. गेल्या पाच दशकांमध्ये या भागात अशा भयानक घटना घडल्या आहेत, ज्यात हजारो लोकांना आपला जीव गमवावा लागला. विशेषत: या घटनांमध्ये निमलष्करी दलाच्या जवानांनी मोठ्या संख्येने बलिदान दिले आहे.

या कारवायांमुळे गेल्या दहा वर्षांच्या तुलनेत नक्षलवादाला बऱ्यापैकी आळा घालण्यात यश आले आहे. २०२१ मध्ये ६० जिल्ह्यांमध्ये पसरलेला नक्षलवाद आता फक्त ३० जिल्ह्यांमध्ये राहिला आहे. हे जिल्हे बिहार, छत्तीसगड, झारखंड, ओरिसा आणि पश्चिम बंगालमधील आहेत. हे सर्व जिल्हे आदिवासीबहुल क्षेत्र असून जंगल आणि डोंगरांनी वेढलेले आहेत. नक्षलवादी या ठिकाणांना "सेफ झोन' मानून आपला अड्डा बनवतात. तेलंगणामध्ये नक्षलवाद आता बॅकफूटवर असला, तरी छत्तीसगड, महाराष्ट्र, ओडिशा, पश्चिम बंगाल तसेच बिहारमध्ये नक्षलवाद्यांची भीती अजूनही कायम आहे. या भागांमध्ये नक्षलवादी सक्रिय असून, एकामागून एक मोठ्या घटना घडून आणत आहेत.

अल्पभूधारक शेतमजूर आणि गरिबांना चांगले जमीन हक्क आणि रोजगार मिळावा, या मागणीसाठी नक्षलवादी वारंवार पोलीस, प्रभावशाली आदिवासी, राजकारणी आणि सरकारी कर्मचाऱ्यांना लक्ष्य करतात. विशेष म्हणजे या वेळच्या मोहिमेत एकाही जवानाचे बलिदान न देता ४० नक्षलवाद्यांना यमसदनी धाडण्यात यश आले. त्यात बस्तर विभागाची म्होरकी असलेल्या उर्मिलावर २५ लाखांचे बक्षीस होते. ती पूर्व बस्तरची प्रभारी होती. येथे १६ नक्षलवाद्यांवर एक कोटी ३० लाखांहून अधिक रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले होते. या वर्षात ७०६ नक्षलवाद्यांना अटक करण्यात आली असून ७३३ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे. या कारवाईनंतर नक्षलवाद्यांचा बालेकिल्ला असलेल्या पूर्व बस्तर विभागातील माओवाद्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

सर्वोच्च नक्षलवादी नेतृत्व या भागाला आपले सुरक्षित आश्रयस्थान मानत होते. आजपर्यंतच्या नक्षली कारवायांमध्ये कांकेरमध्ये झालेल्या कारवाईपेक्षा ही मोठी नक्षल कारवाई ठरली आहे.

४० नक्षलवाद्यांनी थुलथुली जंगलात एक मोठी बैठक घेऊन जवानांचे मोठे नुकसान करण्याची रणनीती आखली होती. या बैठकीला प्रमुख नक्षलवादी नेतेही उपस्थित होते; मात्र पोलिसांनी त्यांचा खात्मा केला. पूर्व बस्तर विभागासह इंद्रावती क्षेत्र समितीमधील डझनभर नक्षलवादी तसेच नक्षलवाद्यांचे प्रमुख नेते कमलेश, नीती ऊर्फ उर्मिला यांच्याशिवाय इतर बडे नक्षलवादी बैठकीसाठी आले होते. यात नक्षलवादी आघाडीचे नेते कमलेश, नीती ऊर्फ उर्मिला यांचीही हत्या झाली. काही नक्षलवादी घटनास्थळावरून फरार झाले. नक्षलवाद्यांच्या कंपनी–६ चे मोठे नुकसान झाले आहे. या मोहिमेचे उत्तम नियोजन करून सुरक्षा दलांनी पाच जिल्ह्यांमधील समर्थ जवानांचा समावेश करून घेतला. यानंतर दंतेवाडा आणि नारायणपूर जिल्ह्यातून एक हजारांहून अधिक डीआरजीफ आणि एसटीएफ जवानांना ऑपरेशनसाठी पाठवण्यात आले.

मुसळधार पावसात बारा किलोमीटरच्या टेकड्या, नद्या, ओढे पार करून थुलाथुली–नेंदूर गावाच्या जंगलात हे पथक पोहोचले. सैनिकांनी त्या परिसरात प्रवेश करताक्षणी जोरदार पाऊस सुरू झाला. पाऊस सुरू झाला नसता तर साडेचारशे नक्षलवाद्यांना पोलिसांची माहिती मिळाली असती. त्यामुळे एक तर त्यांचा प्रतिकार वाढला असता किंवा ते पळून जाऊ शकले असते; मात्र मुसळधार पावसामुळे ते डोंगरावरील एका ठिकाणी थांबले. त्याच वेळी जवानांनी नक्षलवाद्यांना घेरले. नारायणपूर आणि दंतेवाडा पोलीस दलाने दीड ते दोन किलोमीटरच्या परिघात चारही बाजूंनी घेरले. मुसळधार पावसामुळे नक्षलवाद्यांना जवानांचे आगमन लक्षातही आले नाही आणि ही मोहीम फत्ते झाली.

**स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)**

# तेव्हाच! शेतकरी राज्य येईल?




भारताच्या इतिहासात आर्थिक स्वातंत्र्याचे धोरणाचा शेतकरी नेता या देशात पंतप्रधान व राष्ट्रपती हे दोघेही एकाच पंचवार्षिक काळात स्थानापन्न असतील, तोच दिवस खऱ्या अर्थाने शेतकरी व शेतमजुरांच्या जीवनात भाग्यशाली दिवस असेल? तेव्हापासून शेतकऱ्यांना न्याय, अधिकार व हक्क मिळण्यास सुरुवात होईल. भारत हा कृषिप्रधान देश असून अनेक जन–जातीचा समाज गुण्यागोविंदाने एकत्र राहतो. आणि बहुतांश लोकांचा व्यवसाय शेती आहे. सरकारच्या धोरणात शेतकरी सुखी होण्यासाठी शेतीवरील प्रक्रिया उद्योग उभारून, शेतीचे नवीन–नवीन संशोधन, तंत्रज्ञान विकसित करून, तसेच शेतीवरचा खर्च कमी करून, शेतीचे उत्पादन कसे वाढेल, व शेतकरी सुखी कसा होईल यावर सर्व चिंतन मनन झाले? मग भारत सरकारने एवढी मोठी शेतकऱ्यांसाठी विकास यंत्रणा पाठीमागे लावली, कीटक नाशके, रासायनिक खते, जैविक शेती, त्यासाठी जागतिक पातळीवरील वेगवेगळी प्रयोग झालित. तरी गेल्या ७५ वर्षात शेतकरी कां सुखी झाला नाही, हा प्रश्न मात्र आजही अनुत्तरीतच राहिला आहे?

भारत देशात सरकारची एक यंत्रणा शेतीचे उत्पादन वाढवून शहरे पोसण्यासाठी काम करते, तर सरकारचीच दुसरी यंत्रणा शेतीमालाला भाव मिळू नये, याचे नियोजनपूर्वक काम करते. कधी ते आयात–निर्यात धोरणात, तर कधी नैसर्गिक आपत्तीच्या संकटात, तर कधी जागतिक महायुद्धाचे निमित्याने त्यांचे डावपेच सफल होते. किंवा जाती–पातीत धर्माची भांडणे लावून, तसेच अनेक बॉम्बस्फोट घडवून, किंवा शेतकऱ्यांना अनुदान वाटप करून निवडणूक काळात दिशाभूल केली जाते. अश्यामध्येच सर्व शेतकरी व्यवस्था बळी पडण्याचे कटकारस्थान रचल्या जाते.

भारत देशातील राजनीति सुद्धा शेतकरी व्यवस्थेला विरोध करूनच केल्या जाते हेच शेतकऱ्यांचे दुर्भाग्य आहे? शेतीच्या उत्पादन वाढीला धरून व शेतकऱ्यांच्या घरात येणाऱ्या आर्थिक स्त्रोताला सोडून, भारत देशात राजकारण होते. इथेच या देशातील दुटप्पी धोरणामुळे, शेतकऱ्यांच्या आर्थिक स्वातंत्र्यात पाणी मूरते. शेतकऱ्याला सुखी करण्याचे व शेतकऱ्यांना मारण्याचे दुटप्पी नाटक केल्या जाते. विधानसभा– लोकसभामध्ये शेतीवर जगणाऱ्यापैकी अनेक जातीचे लोक निवडून पाठविल्या जातात? परंतु एकमात्र महत्त्वाची दखल घेतल्या जाते. शेती प्रश्नाची जाण नसलेली माणसे विधानसभेत – लोकसभेत पाठविल्या गेल्यामुळे शेतीमालाला भाव मागणारी यंत्रणाच तिथे नसते. आणि हे सर्व जाणीवपूर्वक घडविले जात आहे. स्वातंत्र्याच्या अगोदरचे काळात, व स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्याही काळात शेती आणि शेतकरी प्रश्न ७५ वर्षात सुटला नाही, याला कारणीभूत शेतकऱ्यांच्या आर्थिक स्वातंत्र्याचे मारेकरी काँग्रेस व बीजेपीची राजवट असून या देशात कलह व आत्महत्या घडविणारे हेच दोन मुख्य पक्ष आहेत.

शासकीय व राजकीय यंत्रणाजी शेतकरी सुखी झाली म्हणून बोंबलत आहे, तीच दु–सरी यंत्रणा शेतकऱ्यांना आर्थिक कमजोर करण्यासाठी वापरल्या जात आहे? हेच शेतकऱ्यांचे दुर्दैव आहे. हेच आता आत्महत्या वरून आता स्पष्ट झाले आहे ? भारत देशातील सरकारी यंत्रणा शेतकऱ्याने जोडधंदे करावे, हेच सांगत आली. म्हणजे शेती व्यवसाय न परडविनारा आहे तरी तो जबरदस्तीने, गांजर दाखवून करावा. असेच केंद्र सरकारचे म्हणणे आहे काय? शेतीमालाला भाव कमी ठेवून, जिल्हा परिषदेच्या सरकारी शाळा, सरकारी स्वस्त धान्याचे दुकान, सरकारी दवाखाने उघडल्या जात आहे. शेतकरी उत्पन्नाचे खोटे दाखले तलाठी व तहसीलदाराकडून दिल्या जात आहे. कारण शेतकऱ्याजवळ पैसा नाही, तर तो जगेल कसा हे सरकारला माहित आहे? शेतीतील कच्चा माल, व्यापार पेठेत गेल्याशिवाय औद्योगीकरण सुरू होत नाही, म्हणून शेतीमालाचे भाव कमी ठेवून शेतकरी अडचणीत राहीला तरच शेतमाल व्यापार पेठेत येईल व औद्योगीकरण यंत्रणा ही सुरळीत चालेल, हेच धोरण केंद्र सरकारचे आज पर्यंत राहीले, पुढेही तसेच राहील.

"अबकी बार, किसान सरकार" हे घोषवाक्य हवेतच विरवल्या जात आहे? फक्त जनतेला बेवकूफ बनवण्यासाठी स्टेजवर मारपीट, उधळणी, व एकमेकांना शोकॉज नोटीस देणे चालू आहे. जेव्हापासून निवडणुकीमध्ये अर्थाजन सुरू झाले, तेव्हापासून समाजसेवा हा विषय संपला आणि अशा विचित्र पद्धतीतून सौदेबाज, धोकेबाज, लूचेगिरी व दरोडेखोरी, लाचारी व गुलामगिरी करणारी व्यवस्था तयार झाली. त्यासाठीच सामाजिक लढा देणारे अनेक छोटे राजकीय पक्ष काँग्रेस–बीजेपी ने कमजोर करून ती संपविण्याची तयारी केली आहे. जसे...सजपा, जनता दल ,बी.एस.पी, कम्युनिस्टपक्ष, भारत राष्ट्र समिती, शेतकरी कामगार पक्ष, शेतकरी संघटना, राष्ट्रवादी, आरपीआयचे काही गट, तसेच पूर्व –पश्चिम, उत्तर–दक्षिण राज्यातील चळवळीतील छोटे–मोठे पक्ष सत्ते–तील पैशाच्या जोरावर संपविल्या जात आहेत.

भोळी– भाबडी जनतेला जाती–धर्माच्या व राम मंदिर सारखे प्रश्न उपस्थित करून अश्या धार्मिक कृतीत गुंफून हिंदूंच्या ना–वावर लुटारू व्यवस्था उभी केल्या जात आहे. तसेच काँग्रेसनी सुद्धा समधर्म समभाव सांगुनच जनतेचा उपयोग करून घेतला व शेतकरी हवालदिल केला ही वस्तुस्थिती आहे ?.

म्हणजेच काँग्रेस व बीजेपी ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू असून, या दोन्ही व्यवस्था शेतकरी विरा–धी आहेत. या भारत देशात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक धोरण व महात्मा फुले यांची विचारधारा, शिवाजी महाराजांचा आर्थिक दृष्टिकोन संपविण्याचा आटोकाट प्रयत्न चालू आहे. हे दोन्ही राजकीय पक्ष देश पातळीवर चुकीच्या धोरणाने वागत असून राजनीतीच्या भामटेगिरीत शेतीनिष्ठ व्यवस्थाच संपविली जात आहे. आता तर एकच नारा..... "काँग्रेस–बीजेपी हटाओ, भारत देश बचाओ, भारत देश का किसान बचाओ." तसेच दुसरी बाब लक्षात येते की, कृषीप्रधान देशात "औद्योगीकरण धोरण जोरात, मात्र शेतकरी कोमात" अशीच अवस्था दिसते आहे .

शेतकऱ्यांच्या आर्थिक स्वातंत्र्याचे मारेकरी काँग्रेस व बीजेपी हे दोन्ही पक्ष असून या देशात जाती–धर्मात कलह पसरवून राजकीय सत्ता हस्तगत करण्यासाठी उल्लू बनविले जात आहे. त्यामुळेच प्रत्येक जाती व धर्माची लोक शासनातील हिसा मागण्यासाठी आरक्षणाची व्यवस्था पुढे करीत आहे. तेव्हा आता घर–णेशाहीची वंशावळ संपवावी ला–गेल, तीच ती मंडळी सत्तेत निवडून येऊन लोकशाही धोक्यात आणित आहे. ज्या आमदार–खासदारांची दोन टर्म झाली असेल. ते फक्त पक्षाचे पालन करणारे बाडगूळ असतात. ते नवीन कोणताही बदल घडवु शकत नाही. त्यांना आता मतदारांनी घरी बसविण्याची वेळ आली आहे. आता महाराष्ट्रातील निवडणुका आहेत, महाविकास किंवा महायुती यांची बी टीम न बनता नवीन चिरफाड करूनच नवीन संघर्ष उभा केला तरच महाराष्ट्राची शान डौलाने दिसेल. तसेच शेतकऱ्यांनी स्वतःच घात करून घेतला, शेतकरी संघटनेच्या आंदोलनाच्या सतत पाठीशी न राहता राजकीय पक्षातील सत्ताधीशाच्या मागे लागून स्वतः च्या आत्महत्या करून घेतल्यात? त्यामुळे शेतकरी नेते सुद्धा अहवाल दिल होऊन राजकीय पक्षाच्या पाठीशी लागलेत? त्यामुळे शेतकरी नेत्यांची सुद्धा दैना अवस्था झाली व हे जुने सत्ताधीश त्यांना सत्तेत पोहोचू देत नाहीत.

आतापर्यंत ज्या राजकीय पक्षांनी शेतकरी संपविण्याचे काम केले, त्यांच्याच पाठीशी राजकीय लालसेपोटी (ग्रामपंचायत, पंचायत समिती, कृषी उत्पन्न बाजार समिती, को–ऑपरेटिव्ह बँकेच्या निमित्ताने) शेतकरी पुन्हा चुकीच्या दिशेने उभा राहिला, हेच आता शेतकऱ्यांचे दुर्दैव आहे? शेतकऱ्यांच्या अन्नात माती कालवून, तडजोळीचे राजकारण व धोकेबाज आंदोलने करणारी नेते, डबरूबाज नौटंकी नेते तयार झाली आहेत. महाराष्ट्र हे भारत देशातील अर्थार्जनाचे एक केंद्रबिंदू राज्य आहे. सध्याच्या राजन–ीतीतील सत्ताधीशांनी शेतकरी प्रश्न हा अर्धवट झुलवत ठेवून, जाती धर्म कलह लावणारी राजनीति कार्यान्वित केली, त्यामुळें आता शेतकरी प्रश्न सुटूच शकत नाही.

आर्थिक स्वातंत्र्यासाठी "स्वतंत्र शेतकरी मंत्रालय" तयार होणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांना न्याय व हक्कासाठी "स्वतंत्र कृषी न्यायालय" ही व्यवस्था परिपूर्ण बदल करवी लागेल, त्यासाठी या देशाचा पंतप्रधान व राष्ट्रपती हे दोघंही शेतकऱ्यांच्या आर्थिक स्वातंत्र्याच्या धोरणाचे, व अभ्यासपूर्ण विचाराचे अस–ावे लागतील. पाच वर्षाचा काळ परिपूर्ण करणारा एकही शेतकरी पंतप्रधान टिकू दिला जात नाही. व शेतकऱ्यांना न्याय देणारा राष्ट्रपती होऊ दिला नाही हेच भारतीय शेतकऱ्यांचे दुर्दैव आहे? त्यासाठी शेतकरी प्रश्न व शेतकरी हिताचे कायदे दुरुस्त करणारा, पंतप्रधान व राष्ट्रपती एकाच पंचवार्षिक काळात विराजमान असतील, तेव्हाच शेतकरी राज्य येईल? व नव्याने शेतकरी क्रांतीचा उदय होईल

**लेखक- धनंजय पाटील काकडे ९८९०३६८०५८**

# छोटा गोंदिया परिसरात नाही बनणार घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प, नागरिकांत आनंद

### नागरिकांच्या विरोधामुळे नमले प्रशासन, अन्यत्र जागा शोधणार असल्याचे मुख्याधिकाऱ्यांचे पत्र

**गोंदिया:** शहरातील छोटा गोंदिया परिसरात नगर परिषदेकडून घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प उभारण्याची तयारी सुरु होती. मात्र याचा छोटा गोंदियावासीयांकडून विरोध केला जात होता. अखेर छोटा गोंदियावासीयांच्या विरोधामुळे नगर परिषद प्रशासनाला नमावे लागले असून घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी अन्यत्र जागा शोधू असे मुख्याधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या पत्रात नमूद केले आहे.



शहरातील छोटा गोंदिया परिसरातील तलाठी साझा क्रमांक ३० मधील गट क्रमांक ३१३–१,३१४–१–१ व ३१३–३१४–१ मधील सुमारे अडीच एकर खासगी जागेत नगर परिषदेकडून घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प उभारण्याची तयारी केली जात होती. मात्र या प्रकल्पाला छोटा गोंदिया परिसरातील नागरिकांचा विरोध होता. कारण घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाच्या जागेपासून १०० मीटर अंतरावर मोक्षधाम असून तेथेच महाकाला मंदिर, काली मंदिर, हनुमान मंदिर व इतर धार्मिक स्थळ आहे. या प्रकरणाला घेऊन छोटा गोंदियावासीयांनी राजकीय नेत्यांनाही सहकार्य करण्याचे आवाहन केले होते. यावर माजी आमदार राजेंद्र जैन यांनी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाचा पुरता विरोध केला होता. यावरही नगर परिषदेकडून लेखी पत्र छोटा गोंदियावासीयांना देण्यात आले नव्हते.

मात्र घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाला घेऊन असलेला नागरिकांचा विरोध बघता अखेर मुख्याधिकारी संदीप चिट्रवार यांनी जिल्हाधिकाऱ्यांना पत्र पाठवून छोटा गोंदियात घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाची उभारणी न करता इतरत्र प्रकल्प उभारण्यात येणार असे कळविले आहे.

### छोटा गोंदियावासीयांच्या एकीचा झाला विजय

**छोटा गोंदिया परिसरात घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प उभारण्यात येणार याबाबत कळताच छोटा गोंदियावासी एकत्र आले व त्यांनी प्रकल्पाचा विरोध केला होता. प्रकल्प उभारण्यात आल्यास आंदोलनाचा इशारासुद्धा छोटा गोंदियावासीयांनी दिला होता. प्रकल्पाच्या विरोधात छोटा गोंदियावासीयांना एकत्र येत लढा दिला व त्यांच्या एकीपुढे प्रशास–नाला नमावे लागले.**

# नवनियुक्त शिक्षकांसाठी आयोजित प्रशिक्षण स्थगित करा

**गोंदिया :** राज्यातील नवनियुक्त शिक्षकांसाठी जिल्हास्तरावर सात दिवसांचे प्रशिक्षण ०४ नोव्हेंबर ते १० नोव्हेंबर २०२४ या कालावधीत आयोजित केले आहे. या कालावधीत दिवाळी सुट्ट्या व निवडणुक ड्युट्या असल्याने सदर प्रशिक्षण स्थगित करून विधानसभा निवडणुकीतनंतर घेण्याची मागणी नागपूर विभाग शिक्षक मतदार संघाचे आमदार सुधाकर अडबाले यांनी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पूणेचे संचालक यांच्याकडे केली आहे.



राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मधील मुद्दा क्रमांक ५.१५ ते ५.२१ मध्ये शासकीय, खासगी अनुदानित, अंशतः अनुदानित, स्थानिक स्वराज्य संस्था शाळांतील सर्व नवनियुक्त शिक्षकांसाठी जिल्हास्तरावर सात दिवसांचे (५० तासांचे) प्रशिक्षण ०४ नोव्हेंबर ते १० नोव्हेंबर २०२४ या कालावधीत राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पूणेच्या वतीने आयोजित केले आहे.

सदर कालावधीमध्ये दिवाळीच्या सुट्ट्या आहेत. यामुळे अनेक शिक्षक बाहेरगावी जात असतात. तसेच या कालावधीदरम्यान विधानसभेची निवडणूक आहे. या विधानसभा निवडणुकीसाठी शिक्षकांच्या ड्युट्या सुद्धा लागलेल्या आहेत. अशावेळी सदर प्रशिक्षण योग्यरित्या होणे शक्य नाही.यामुळे हे प्रशिक्षण तात्पुरते स्थगित करून विधानसभा निवडणुकीनंतर घेण्यात यावे, अशी मागणी आमदार सुधाकर अडबाले यांनी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पूणेचे संचालक, प्रधान सचिव, आयुक्त (शिक्षण), संचालक (प्राथ./माध्य/उच्च माध्य.) यांच्याकडे केली आहे.

# भारतीय समाजमन आणि निवडणुका

सध्या महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीचे वारे वाहायला लागलेले आहे. त्याआधी संपूर्ण देशभरात लोकसभेच्या निवडणुका पार पडल्या. भारत हा लोकशाहीप्रधान देश असल्यामुळे दर पाच वर्षांनी लोकसभा आणि प्रत्येक राज्याच्या विधानसभा निवडणुका होत असतात. अठरा वर्षे पूर्ण केलेल्या प्रत्येक भारतीय नागरिकाला मतदानाचा अधिकार प्राप्त आहे. या अधिकाराचा वापर करून आपण वेगवेगळ्या पक्षाच्या लोकांना निवडून देतो आणि त्यांच्या माध्यमातून नंतर राज्य, देश चालविण्यासाठी सरकार तयार होत असते. अनेक वर्षापासून ही प्रक्रिया सुरू आहे. भारतीय लोकांना राजकारणामध्ये खूप रुची आहे. निवडणुकीच्या काळात प्रत्येक व्यक्ती प्रत्यक्ष–अप्रत्यक्षपणे राजकीय चर्चेमध्ये सहभागी होत असतो. आपले कुटुंब, मित्रमंडळी, विविध राजकीय पक्षाचे प्रतिनिधी यांच्यासोबत कोणत्या ना कोणत्या माध्यमातून निवडणुकीच्या काळात राजकीय विषयांवर जोरदार चर्चा रंगत असते. आपल्या देशात प्रत्येक वर्गाचे प्रश्न वेगवेगळे आहेत. ते कधी व्यवसायानुसार, कधी जाती–धर्मानुसार, कधी गरीब–श्रीमंतीनुसार ठरत असतात. व्यापारी– व्यावसायिक यांच्या समस्या वेगळ्या आहेत. शेतकरी, शेतमजूर, भूमिहीन यांचे प्रश्न वेगळे आहेत. महिलांच्या समस्या खूप अलग आहेत. विद्यार्थ्यांचे प्रश्न, नोकरदारांचे, कामगारांचे प्रश्न वेगवेगळे आहेत. क्षेत्र कोणतेही असो; परंतु प्रत्येक ठिकाणी प्रश्न, समस्या, अडचणी आहेतच आणि या प्रश्नांवरून अनेकदा सत्ताधारी पक्षाला प्रश्न विचारले जातात. निवडणुकीच्या काळात या सर्व समस्या,अडचणींचा पाढा वाचला जातो.मग त्याचे फायदे–तोटे सत्ताधारी आणि विरोधक दोघांनाही सहन करावे लागतात.

तसेच प्रत्येक राज्यानुसार सुद्धा काही वेगवेगळे प्रश्न आ–हेत. त्यानुसार त्या त्या राज्यात सत्ताधारी आणि विरोधक काम करीत असतात आणि लोकांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करतात. आपला मतदार खुश व्हावा म्हणून अनेकदा सत्ताधाऱ्यांकडून वेगवेगळ्या योजना जाहीर केल्या जातात. त्या माध्यमातून मतदारांना आपल्याकडे वळविण्याचा प्रयत्न केला जातो. प्रत्येकच पक्ष हे करत असतो. परंतु त्यामुळे मतदारांना वाईट सवयी लागतात.अनेकदा मतदान करतेवेळी उमेदव–ाराचे चारित्र्य, शिक्षण, कार्य पाहण्याऐवजी पैसा, जात, धर्म, आश्वासने, योजना यावर मतदान केल्या जाते.

भारतात बहुपक्षीय लोकशाही प्रणाली असल्यामुळे एकाच वेळी अनेक पक्ष निवडणुकीच्या रिंगणात उभे असतात. त्यामध्ये काही प्रमुख पक्षाचे उमेदवार असतात तर काही उमेदवार अपक्ष म्हणून आपले नशीब आजमावतात. याम ध्ये प्रमुख पक्षाच्या उमेदवारांवर जास्त लक्ष केंद्रित होते. अपक्ष म्हणून निवडून येण्यासाठी खूप कठीण जाते. जो अपक्ष उमेदवार फार मोठे सामाजिक कार्य करतो, जनमानसात लोकप्रिय असतो, प्रत्येकापर्यंत पोहोचलेला असतो असेच काही मोजके अपक्ष लोक निवडून येतात. परंतु प्रमुख पक्षांच्या उमेदवारांना मात्र एवढे कष्ट करावे लागत नाही कारण त्यांच्या पक्षाची ठराविक मते ठरलेली असतात आणि मग बाकीच्या मतांसाठी त्यांना मतदारांना आपल्याकडे वळविण्याचा प्रयत्न करावा ला–गतो. अशावेळी उमेदवाराचा कस लागतो. उमेदवार कोणत्या प्रकारे, कोणत्या क्लुप्त्या वापरून मतदारांना आपल्याकडे खेचून आणण्यात यशस्वी होतो यावरच त्याचा विजय अवलंबून असतो.



भारतीय समाज मन हे भावनिक आहे. अनेकदा भावनेच्या आहारी जाऊन भारतातील लोक मतदान करतात. जातीय धार्मिक, भावनांना हवा देऊन मतदारांना आपल्याकडे खेचले जाते. तसेच एखाद्या उमेदवाराचे अचानक निधन झाले असेल तर पोट निवडणुकीत त्याच्या कुटुंबातीलच व्यक्तीला उमेदवारी देऊन लोकांना भावनिक आवाहन करून मतदान करण्यास प्रवृत्त केले जाते.

उमेदवाराचे चारित्र्य, त्याचे शिक्षण, अभ्यास, जनतेप्रती असलेली बांधिलकी या गोष्टी पाहून आपल्या देशात फार कमी लोक मतदान करतात. आपल्या जातीच्या उमेदवारांना मत देण्याकडे बहुतांश लोकांचा कल असतो. त्यामुळे अनेकदा हुशार आणि चारित्र्यसंपन्न उमेदवार पराभूत होतात आणि त्यांच्या तुलनेत कमजोर असलेले लोक जात किंवा पैशाच्या भरवशावर निवडून येतात ही अतिशय गंभीर बाब आहे. परंतु आपल्या देशात सर्वच पक्षांच्या बाबतीत ही गोष्ट घडताना आपला दिसून येते. त्यामुळेच निवडणुकीत तिकिटे वाटप करताना राजकीय पक्ष सुद्धा प्रत्येक मतदारसंघातील जातीचे गणित पाहून जाती प्राबल्यानुसार तिकिटांचे वाटप करीत असतात. ही गोष्ट जरी योग्य नसली तरी आता सर्व राजकीय पक्षांनी निवडून येणे हा एकच क्रायटेरिया ठरवल्यामुळे चांगले–वाईट या गोष्टीकडे फारसे कोणी लक्ष देत नाही. जो उमेदवार शंभर टक्के निवडून येईल त्यालाच प्राधान्य दिले जाते आणि भारतीय लोकांनी सुद्धा आता ही गोष्ट स्वीकारलेली असल्यामुळे राजकीय पक्षांना सुद्धा यामध्ये काहीच गैर वाटत नाही.

सर्वसामान्य माणसाला आता निवडणुका लढविणे सहजासहजी शक्य नाही. कारण उमेदवार कितीही चांगला असला तरी प्रचंड पैसा असल्याशिवाय तो निवडून येऊ शकत नाही ही गोष्ट आता सर्वांनाच मान्य आहे. त्यामुळे सर्वच राजकीय पक्ष पैसे असणाऱ्या श्रीमंत उमेदवाराला प्राधान्य देतात. मतदार सुद्धा ज्या उमेद–वाराचा प्रचारामध्ये प्रचंड झगमगाट असेल त्याच्याकडे जास्त आकर्षित होतात आणि एखादा अतिशय कार्यतत्पर उमेदवार असेल परंतु प्रचारात जर तो पैशाच्या अभावी आपली ताकद दाखवू शकला नाही तर त्याला मात्र दुर्लक्षित केले जाते. हे कटू असले तरी सत्य आहे. त्यामुळे सध्याचा काळ हा निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांसाठी अतिशय कठीण झालेला आहे.

निवडणुकीच्या काळात मतदारांच्या सुद्धा प्रचंड अपेक्षा वाढलेल्या असतात आणि एकदा निवडून आल्यानंतर पाच वर्षे उमेदवार आपल्याकडे पाहत नाही. त्यामुळे आता निवडणुकीच्या काळात 'खाओ–पिओ, मजा करा' अशी मानसिकता बऱ्याच मतदारांची झाल्यामुळे ते मजा करतात आणि सर्व राजकीय पक्षाच्या उमेदवारांना नाकी नऊ आणतात. अशाप्रकारे आपल्या देशात निवडणुका हा एक उत्सव झाला असून प्रत्येक जण या काळात वेगवेगळ्या प्रकारे म ौजमजा करण्याचा प्रयत्न करतात. मतदान करताना मात्र फारसे गांभीर्याने केले जात नाही. त्यामुळे अनेकदा मग पश्चाताप करण्याची पाळी येते.

**प्रेमकुमार बोके**

# जिल्ह्यातील १ लाख ७१ हजार ९०६ शेतकऱ्यांनी केली ई-पीक नोंदणी

## ३१ ऑक्टोबरपर्यंत करा नोंदणी, ई-पीक नोंदणी न केल्यास सरकारी मदतीलाविसरा

**गोंदिया:** शासनाकडून देण्यात येणाऱ्या विविध सुविधा तसेच अनुदान मिळविण्यासाठी ई-पीक नोंदणी आवश्यक आहे. यंदा यासाठी ३१ ऑक्टोबरपर्यंतची मुदत देण्यात आली आहे. आतापर्यंत एक लाख ७१ हजार ९०६ शेतकऱ्यांनी नोंदणी केल्याचे दिसून येत आहे.

खरीप व रब्बी या दोन्ही हंगामामध्ये शेतकऱ्यांना आपल्या पिकाची नोंद करण्यासाठी दरवर्षी ई-पीक पाहणी पूर्ण करावी लागते. यंदा १ ऑगस्ट ते ३१ असा कालावधी ई-पीक नोंदणी करण्यासाठी उपबल्ध करुन देण्यात आला होता.मात्र विविध कारणांनी ई-पीक ॲपवर नोंदणी करताना अडथडा निर्माण होत होता. त्यामुळे अनेक शेतकरी नोंदणी करण्याचे राहिले होते.




शेतकऱ्यांची अडचण लक्षात घेता शासनाने ३१ ऑक्टोबरपर्यंत नोंदणी करण्याच्या सुचना दिल्या आहेत. यंदा पीक विमा योजनेस पाहिजे तसा प्रतिसाद मिळाला नाही. पिकांचे नुकसान झाल्यास ई-पीक पाहणी केलेली नोंद फायदेशीर ठरण्यास मदत होणार आहे.

### पीक नोंदणी करणाऱ्या शेतकऱ्यांची तालुकानिहाय संख्या

| तालुका | नोंदणी करणारे शेतकरी | पीक पाहणी क्षेत्र (हेक्टरमध्ये) |
|---|---|---|
| अर्जुनी मोरगाव | २११९३ | २०६४४.११ |
| आमगाव | २१२१६ | १६७८६.६८ |
| गोरेगाव | २०२३४ | १८३००.३१ |
| तिरोडा | २१४६१ | २७०३३.३६ |
| देवरी | १४६०७ | २०९१९.३५ |
| सडक अर्जुनी | १६३४७ | १६२०७.७४ |
| सालेकसा | १४७७० | १४१३९.८१ |
| जिल्ह्यातील एकूण | १७१९०६ | १६३१९५.७७ |

### १ लाख ७२ हजार शेतकऱ्यांची नोंदणी

**जिल्ह्याता दोन लाख ७२ हजार शेतकऱ्यांपैकी यंदा १५ ऑक्टोबरपर्यंत एक लाख ७१ हजार ९०६ शेतकऱ्यांनी ई-पीक पाहणी ॲपवर नोंदणी केली आहे. याचे एक लाख ६३ हजार १९५.७७ हेक्टर क्षेत्र होत आहे.**



### धानाला हेक्टरी ४८ हजारांचा विमा

**प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत विमा हप्ता म्हणून एक रुपया भरावा लागणार आहे. नुकसानीसाठी ७० टक्क्यांप्रमाणे भरपाई मिळणार आहे. जिल्ह्यात धानाचे पीक घेतले जाते. धानाला हेक्टरी ४८ हजार रुपयांचा विमा मिळणार आहे.**

### बोगस विमा काढणाऱ्यावर होणार कारवाई

**पीक विमा योजनेत बोगस सहभाग घेणाऱ्या व्यक्तीवर आता कारवाई करण्यात येणार आहे. असा प्रकार आढळल्यास कंपनी कृषी विभागाच्या निदर्शनास आणून देईल. त्या व्यक्तीविरोधात एफआयआर दाखल करण्यात येईल.**

# दवनीवाडा तालुका निर्मिती थंडबस्त्यात

## ३० वर्षापासून मागणी, सर्वेक्षण सुरु झाले अन् आचारसंहिता लागली

**गोंदिया:** जिल्हा मुख्यालय असलेल्या गोंदिया तालुक्याच्या व्याप मोठा आहे. नागरिकांना कामासाठी ताटकळत रहावे लागते. त्यामुळे गोंदिया तालुक्याचे विभाजन करुन दवनीवाडा तालुका निर्मितीचा ठराव जिल्हा परिषदेने ३० वर्षापुर्वी घेतला. तेव्हापासून ही फाईल केवळ टेबलवरुन प्रवास करीत आहे. आता चार महिन्यापुर्वी शासनाने हिरवा कंदिल दिला. तलाठी साझयांमध्ये सर्वेक्षण सुरु झाले. आता आचारसंहिता लागल्याने पुन्हा हा विषय थंडबस्त्यात जातो की काय? अशी शंका उपस्थित होत आहे. गोंदिया पंचायत समिती ठराव ६ सप्टेंबर २००५ व १३ डिसेंबर १९९० ला तत्कालीन मुख्यमंत्री शरदचंद्र पवार यांनी दवनीवाडा तालुका निर्माणचा ठराव पत्र मिळाल्याचे पत्र तत्कालीन हरीष मोरग यांना व समितीला दिले होते. यानंतर वरिष्ठ पातळीवर पत्रव्यवहार झाला. मात्र पुढे काहीच झाले नाही. दवनीवाडा परिसरातील नागरिकांना लहानसहान कामासाठी थेट गोंदिया गाठावे लागत आहे. त्यात त्यांचा पैसा व वेळ जातो. एकाच कामासाठी कित्येक दिवस प्रतीक्षा करावी लागते. विकास कामांवरही त्याचा परिणाम जाणवत आहे. मात्र तालुका निर्मितीचे घोडे पुढे सरकायला तयार नाही. चार महिन्यापुवर्वी शासनाने तालुका निर्मितीसाठी हालचालू सुरु केल्या. प्रशासनाला सर्वेक्षण करण्याचे आदेश आले. नवीन तालुक्याच्या हालचाली सुरु झाल्या. तलाठी मंडळ अधिकारी यांना सर्वेक्षण करण्याच्या सुचना मिळाल्या. मात्र आता पुन्हा आचारसंहिता आणि निवडणूक आडवी आली. त्यामुळे हा विषय पुन्हा थंडबस्त्यात पडणार आह.दवनीवाडाला आठवड्यातून दोन दिवस नायब तहसीलदाराचे कार्यालय उघडण्यात येतील असे सांगण्यात आले आहे.

### तिरोडा पं.स.ने १९८५ मध्ये घेतला होता ठराव




**दवनीवाडा तालुका घोषित करण्यात यावा यासाठी तिरोडा पंचात समितीने ६ जून १९८५ मध्ये ठराव घेतला. तसेच तत्कालीन भंडारा जिल्हा परिषदेने ५ नोव्हेंबर १९९६ सर्वसाधारण सभेत ठरावही घेतला. तत्कालीन जि.प. अध्यक्ष टोलसिंग पवार यांच्या अध्यक्षतेखाली तत्कालीन जि.प.सदस्य कृष्णकुमार जायस्वाल यांनी हा मुद्दा उपस्थित केला होता. त्यांना म्हाडाचे सभापती व तत्कालीन सदस्य नरेश माहेश्वरी, केशव मानकर, पुरुषोत्तम वशिष्ट यांनी अनुमोदन दिल्यानंतर सभागृहात एकमताने पारीत झाला.**

# अंदाजे ३ कोटी ९१ लाख किंमतीचे सोने जप्त

**गोंदिया :** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ करीता निवडणूक घोषित झाल्यापासून आदर्श आचारसंहिता लागु होताच गोंदिया जिल्ह्यातील ६६-आमगाव विधानसभा मतदार संघात विविध ठिकाणी FST आणि SST पथकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

दिनांक १९ ऑक्टोबर २०२४ रोजी सदर मतदार संघातील आमगाव तालुक्यात कार्यरत FST आणि SST पथक यांनी केलेल्या संयुक्त कार्यवाहीत आमगाव-लांजी बॉर्डर येथून वाहन क्रमांक सीजी०४ एन२८७६ मधून ७८९२ ग्रॅम अंदाजे ३ कोटी ९१ लाख किंमतीचे सोने जप्त करण्यात आले. तहसिलदार आमगाव आणि ठाणेदार पोलीस स्टेशन आमगाव यांचे निगराणीत जप्त मुद्देमाल सीलबंद करुन पोलीस संरक्षणात जिल्हा कोषागार कार्यालय गोंदिया यांचे अभिरक्षेतील सुरक्षा कक्षात ठेवण्यात आला आहे.

सदर कार्यवाही जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक, उपजिल्हा निवडणूक अधिकारी, गोंदिया यांचे मार्गदर्शनात करण्यात आली. सदर कार्यवाहीची नोंद ESMS ॲपमध्ये घेऊन मुद्देमलाची तपासणी करुन पुढील कारवाई भारत निवडणूक आयोग यांच्या निर्देशानुसार करण्यात येईल. असे निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी देवरी कविता गायकवाड यांनी कळविले आहे.

## शपथ घेऊन मतदान जनजागृती

**गोंदिया:** ६६ आमगाव विधानसभा क्षेत्रामध्ये मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी वेगवेगळे उपक्रम राबविण्यात येत आहे. लोकशाहीचा सर्वात मोठा उत्सव सुरु झाला असून या उत्सवामध्ये सर्व घटकांनी सहभागी होण्याकरिता निवडणूक आयोगामार्फ्रत स्वीप कार्यक्रमाच्या माध्यमातून वेगवेगळे उपक्रम राबविण्यात येत आहेत. गटविकास अधिकारी गिरेपुंजे, विस्तार अधिकारी एल.एन कुडे यांनी उपस्थित शिक्षकांना मतदान जनजागृतीची शपथ दिली.

# अव्वल कारकून होणार सहायक महसूल अधिकारी

## तलाठी आता ग्राम महसूल अधिकारी, कोतवाल झाले महसूल सेवक

**अर्जुनी मोरगाव:** राज्य महसूल कर्मचारी संघटनेच्या महसूल विभागाअंतर्गत क्षेत्रीय कार्यालयामार्फत अव्वल कारकून गट-क कर्मचाऱ्यांची अव्वल कारकून ऐवजी सहायक महसूल अधिकारी असे पदनाम करण्याची मागणी अनेक वर्षापासून करण्यात येत होती. अखेर महसूल व वनविभाग यांच्यावतीने सोमवार (दि.१४) महसूल विभागातील अव्वल कारकून यांचे पदनाम बदलण्यात येऊन सहायक महसूल अधिकारी व कोतवाल यांचे नाव महसूल सेवक असे करण्यात आले आहे. यासंबंधीचे शासन निर्णय काढण्यात आलेले आहेत.

अव्वल कारकून तसेच कोतवाल हा शब्द ब्रिटीशकालीन असल्यानेत्यातच महसूल विभागातील अव्वल कारकून कर्मचारी यांच्या कामकाजानुसार हे पदनाम कमी दर्जाचे लेखण्यात येत होते. त्यामुळे कामाच्या दर्जानुसार पदनाम देखील असले पाहिजे म्हणून महसूल कर्मचारी संघटनेच्यावतीने शासनाकडे मागील अनेक वर्षापासून महसूल विभागातील ब्रिटीशकालीन नामे बदण्यात यावीत, अशी मागणी रेटून धरली होती. त्यानुसार शासनाने शासन निर्णय काढून महसूल कर्मचाऱ्यांचा सम्मान केला असल्याचे महसूल कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष व राज्य सहसचिव आशिष रामटेके यांनी सांगितले. वरीलप्रमाणे पदनाम बदल केल्याबाबत त्यांनी संघटनेच्या वतीने शासनाचे महाराष्ट्र राज्य महसूल कर्मचारी संघटनेच्या महसूल विभागाअंतर्गत क्षेत्रीय कार्यालयामार्फत अव्वल कारकून गट-कर्मचाऱ्यांची अव्वल कारकुनाऐवजी सहायक महसूल अधिकारी असे पदनाम करण्याची मागणी अनेक वर्षापासून करण्यात येत होती. अखेर महसूल व वनविभागाच्यावतीने १४ ऑक्टोबर रोजी महसूल विभागातील अव्वल कारकून यांचे पदनाम बदलण्यात येऊन सहायक महसूल अधिकारी, तलाठी यांचे नाव ग्राम महसूल अधिकारी, तसेच कोतवाल यांचे नाव महसूल सेवक असे करण्यात येत असल्याचा शासन निर्णय काढण्यात आला आहे. त्यामुळे महसूल कर्मचारी संघटनेच्या प्रयत्नांना यश प्राप्त झाले आहे.

### आधीचे पदनाम हे कमी दर्जाचे असल्याचा सूर



**अव्वल कारकून, तसेच कोतवाल हा शब्द ब्रिटीशकालीन असल्याने त्यातच महसूल विभागातील अव्वल कारकून कर्मचारी यांच्या कामकाजानुसार हे पदनाम कमी दर्जाचे लेखण्यात येत होते. त्यामुळे कामाच्या दर्जानुसार पदनाम देखील असले पाहिजे म्हणून महसूल कर्मचारी संघटनेच्यावतीने शासनाकडेन मागील अनेक वर्षापासून महसूल विभागातील ब्रिटीशकालीन नामे बदलण्यात यावीत, अशी मागणी रेटून धरली होती. त्यानुसार शासनाने शासन निर्णय काढून महसूल कर्मचाऱ्यांचा सम्मान केला असल्याचे महसूल कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष व राज्य सहसचिव आशिष रामटेके यांनी सांगितले.**

### विद्यार्थी पालकांना करणार मतदानाचे आवाहन

**गोंदिया:** लोकशाहीचा सर्वात मोठा उत्सव सुरु झाला असून या उत्सवामध्ये सर्व घटकांनी सहभागी होण्याकरिता निवडणूक आयोगामार्फ्रत स्वीप कार्यक्रमाच्या माध्यमातून वेगवेगळे उपक्रम राबविण्यात येत आहेत. मतदानाची टक्केवारी वाढविण्याच्या हेतूने अर्जुनी मोरगाव येथील मतदार संघातील शालेय विद्यार्थी त्यांच्या पालकांना व नातेवाईकांना पत्र लिहून निवडणुकीत मतदान करण्याचे आवाहन करून प्रोत्साहित करणार आहेत.भारतीय राज्यघटनेने १८ वर्षावरील सर्व नागरिकांना मतदानाचा अधिकार दिला आहे. मतदान करणे हे प्रत्येक नागरिकाचे प्रथम कर्तव्य आहे. हे कर्तव्य बजावत असतांना सुजाण नागरिक म्हणून निवडणुकीत मतदान करा. लोकशाहीचा पाया मजबूत करण्यासाठी तसेच भविष्याच्या पिढीसाठी आपले मत मौल्यवान आहे. निवडणुकीत मतदान करताना कोणत्याही दबावाला, अमिषाला बळी न पडता निर्भीडपणे मतदानाचा हक्क बजावावा, अशा आशयाचे पत्र शालेय विद्यार्थी त्यांच्या पालकांना व नातेवाईकांना देणार आहेत.

# मतदान यंत्राचे सरमिसळीकरण




**गोंदिया :** येत्या २० नोव्हेंबर २०२४ रोजी विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदान होणार आहे. भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार आज २० ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात जिल्हाधिकारी प्रजित नायर यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हा विज्ञान सूचना अधिकारी पंकज गजभिये यांनी प्रमुख राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींसमोर संगणकाद्वारे मतदान यंत्राचे प्रथम सरमिसळीकरण प्रात्यक्षिक करुन दाखविले.

यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी किरण अंबेकर, ईव्हीएम नोडल अधिकारी डॉ. सी.डी.गोळघाटे, ईव्हीएम सहायक नोडल अधिकारी डॉ. पी.एस.शर्मा, डॉ. आर.आर.गावंडे, डॉ. जयंत खुरपडे तसेच प्रमुख राजकीय पक्षाचे प्रतिनिधी म्हणून भाजपाचे तिजेश गौतम, शिवसेना शिंदे गटाचे अमोल नतेश्वरी, काँग्रेसचे राजकुमार पटले, राष्ट्रवादी काँग्रसचे नानु मुदलीयार उपस्थित होते.

# नुकसान टाळण्यासाठी यंदा सुरुवातीलाच भरडाईचे करारनामे

**गोंदिया:** गेल्या दोन वर्षात शासकीय धान खरेदी केंद्रावर खरेदी करण्यात आलेल्या धानाची जवळपास आठ महिने भरडाई न झाल्याने मोठ्या धानाचे नुकसान झाले आहे. तर धानाची वेळीच उचल न झाल्याने धान खरेदी करणाऱ्या संस्थांना सुद्धा आर्थिक फटका बसला. तशी वेळ यंदा येऊ नये यासाठी शासनाने धान खरेदीच्या सुरुवातीलाच भरडाईचे सुद्धा राइस मिलर्ससह करारनामे करण्याचे आदेश काढले आहे.

शासकीय धान खरेदीतील अनागोंदी कारभार टाळण्यासाठी गेल्या दोन वर्षापासून शासनाच्या एनईएमएल या पोर्टलवर ऑनलाईन नोंदणी करणाऱ्या शेतकऱ्यांना शासकीय धान खरेदी केंद्रावर धान विक्रीचा नियम लागू केला. यंदा खरीप हंगामातील धान खरेदीसाठी नोंदणी करण्यास शनिवारपासून (दि.१९) सुरुवात झाली. ज्या शेतकऱ्यांनी ई-पीक नोंदणी केली आहे. त्याच शेतकऱ्यांकडून धान खरेदी केली जाणार आहे. नोंदणील दहा दिवसात शासकीय धान खरेदी केंद्रावर हमीभावाने धान खरेदी सुरु केली जाणार आहे. यासाठीची प्रक्रिया सुरु झाली आहे. तर धान खरेदी केंद्रावर खरेदी करण्यात आलेल्या धानाची वेळीच भरडाई व्हाची याचे नियोजन करण्यात आले आहे.

यासाठी राइस मिलर्स सुरुवातीलाच करारनामे करण्याचे निर्देश दिले आहे. यामुळे धानाची तुट कमी होण्यास आणि गोदाम भाड्याची सुद्धा बचत होणार आहे. तर वेळीच उचल झाल्याने दरवर्षी धान खराब होऊन नुकसान होत होते. हे नुकसान टाळण्यास सुद्धा मदत होणार आहे.

### २३३० हमीभावाने होणार धान खरेदी

**शासनानी यंदा धानाच्या प्रति क्विंटल हमीभावात वाढ केली आहे. त्यामुळे शासकीय धान खरेदी केंद्रावरुन शेतकऱ्यांकडून २३३० प्रति क्विंटल दराने धान खरेदी केली जाणार आहे. हमीभावापेक्षा कमीदराने धान खरेदी करणाऱ्या केंद्रावर कारवाई केली जाईल, असे निर्देश संबंधित विभागाने दिले आहे.**

# एकरात धानाला खर्च १८ हजार; पदारात पडतात १५ हजार रुपये

## शेतकऱ्यांना शेती करणे परवडेना, मेहनत व खर्चापुढे उत्पन्न मात्र कमीच

**गोंदिया:** यंदा जून व जुलै महिन्यापासून पर्जन्यमान चांगले राहिल्याने शेतकऱ्यांनी पेरलेले धान चांगले आले, परंतु अनेक ठिकाणी ते पाण्यात गेले.

यावर्षी सुरुवातीपासूनच धानाला २३३० भाव जाहीर करण्यात आला. धान कापणीवर आला असतानाही पाऊस येत असल्याने हातात येणारे पीक जाणार तर नाही ना, अशी चिंता शेतकऱ्यांना सतावत आहे.

### एकरी खर्च किती

| | |
|---|---|
| पेरणीपूर्व मशागत- | ३५०० |
| बी-बियाणे- | ४००० |
| फवारणी- | ३००० |
| काढणी- | ५००० |
| इतर- | २५०० |



### यांत्रिकीकरणाने वाढला रोवणी व आवत्याचा खर्च

**पुर्वी पारंपरिक शेती अवजारांचा वापर करुन शेती मशागतीची कामे व लागवड केली जात होती. आता यांत्रिकीकरणाचा वापर वाढल्याने धान पीक लागवडीचा खर्च दुपटीपेक्षा अधिक वाढला आहे. त्या तुलनेत धानाच्या आधारभूत किंमतीत वाढ झाली नाही.**

### उत्पादन खर्च आवाक्याबाहेर

**शेतकऱ्यांना उत्पादन खर्चावर आधारित भाव देण्याच्या वल्गना प्रत्येक सरकारकडून केल्या जात असल्या तरी धान उत्पादक शेतकऱ्यांच्या वाट्याला उपेक्षाच आली आहे. यंदा २३३० आधारभूत किमत ठरविण्यात आली. एका एकरात सरासरी १५ क्विंटल धान काढले जात.**



**म्हणजेच, एकरी धान ३५ हजार रुपयांचे उत्पन्न होते. परंतु धानासाठी सुरुवातीपासून मळणीपर्यंत १८ ते २० हजार रुपये खर्च होत असल्याने शेतकऱ्यांना १३ ते १५ हजार रुपये एकरी नफा मिळत आहे. धानासाठी शेतकऱ्यांची मेहनत बघता शेती करणे परवडत नाही.**

# जिल्हा प्रशासनाने केला टीबीमुक्त ६५ ग्रामपंचायतींचा सत्कार

## राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम, गोंदिया तालुका ठरला अग्रेसर, दुसऱ्या क्रमांकावर सडक अर्जुनी तालुका

**गोंदिया:** राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रम अंतर्गत सन २००५ पर्यंत संपूर्ण भारत क्षयरोगमुक्त करण्याचा केंद्र शासनाचा संकल्प आहे. त्या अनुषंगाने राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार टीबीमुक्त ग्रामपंचायत अभियान गौरव सोहळ्यानिमित्त ६५ ग्रामपंचायतींना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. याप्रसंगी उर्वरित ग्रामपंचायतीनीही टीबीमुक्तीसाठी प्रयत्न करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी केले आहे.

सोमवारी (दि.१४) जिल्हा परिषदेच्या स्व.यशवंतराव नाईक सभागृहात ६५ ग्रामपंचायतींना त्यांनी टीबीमुक्त केलेल्या कार्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते महात्मा गांधीजींच्या पुतळा स्मृतीचिन्हासह प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाची



सुरुवात राष्ट्रपिता महात्मा गांधी व टीबी क्षयरोग जंतुशोध जनक रॉबर्ट कॉक यांच्या प्रतिमेला माल्यार्पण व दीपप्रज्वलन करुन करण्यात आली.

कार्यक्रमाला जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, एम.मुरुगानंधम, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अमरीश मोहबे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नितीन वानखेडे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. अभिजीत गोल्हार, सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी आनंद पिंगळे, सहायक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अरविंद वाघमारे, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. विनोद चौहान, जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. रोशन राऊत, जिल्हा प्रशिक्षण केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. नितीन कापसे, जिल्हा क्षयरोग विभागाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. वेदप्रकाश चौरागडे, डॉ. देव चांदेवार व कुष्ठरोग विभागाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. भाग्यश्री गांवडे, जिल्हा माध्यम व विस्तार अधिकारी विजय आखाडे उपस्थित होते.

प्रास्ताविकातून डॉ. गोल्हार यांनी क्षयरोग दूर करण्यासाठी आणि त्यांच्या योगदानाचे सार्वजनिकरित्या गौरव करणे असे या उपक्रमाचे उद्देश असून यातूनच जिल्ह्यात सन २०२३ साठी ६५ ग्रामपंचायतींची निवड होऊन सम्मानित करण्यात येत असल्याचे सांगितले.

### सरपंचासह आरोग्य अधिकारी व सेविकांनाही निमंत्रण

**टीबीमुक्त झालेल्या ६५ ग्रामपंचायतीच्या गौरव सोहळा कार्यक्रमात ६५ ग्रामपंचायतीचे सरपंच, तालुका आरोग्य अधिकारी, सामुदायिक आरोग्य अधिकारी, आरोग्यसेविका, आरोग्य सेवकांना सम्मानासाठी निमंत्रित करण्यात आले होते. त्यांच्या प्रयत्नांचे हे फलित असल्याचे त्यामागून दिसून आले.**

### तालुकानिहाय ग्रामपंचायतींची संख्या

| तालुका | ग्रामपंचायत |
|---|---|
| गोंदिया | १४ |
| सडक अर्जुनी | ११ |
| अर्जुनी मोरगाव | १० |
| तिरोडा | ०९ |
| आमगाव | ०८ |
| गोरेगाव | ०५ |
| देवरी | ०४ |
| सालेकसा | ०४ |

# जिद्द आणि चिकाटीची भुक उराशी बाळगून ध्येय प्राप्ती करावी:-इंजि यशवंत गणविर

**अर्जुनी मोरगाव:-** तालुक्यातील गौरनगर येथे सार्वजनिक दुर्गा उत्सव मंडळाच्या वतीने झाडीपट्टीत गाजलेल्या भुक या नाट्य प्रयोगाचे आयोजन करण्यात आले होते.या नाट्य प्रयोगाचे उद्घाटन जिल्हा परिषद उपाध्यक्ष तथा सभापती शिक्षण क्रीडा व आरोग्य इंजि यशवंत गणविर यांच्या शुभहस्ते, माजी सभापती उमाकांत ढेंगे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले.

उद्घाटनिय मनोगत व्यक्त करताना म्हणाले की,आजचे युग हे स्पर्धेचे तंत्रज्ञानाचे विज्ञानाचे युग आहे आणि या युगात टिकून राहण्यासाठी शिक्षण हा महत्त्वाचा घटक आहे.शिक्षणाच्या प्रवाहातुनच आपण सामाजिक, आर्थिक व राजकीय क्रांती घडवून आणु शकतो व स्वत: ला सक्षम बनवु शकतो.शिक्षणामुळे मानवी जीवनमान बदलते शैक्षणिक जीवनात आपल्याला समाजकारण राजकारण व अर्थशास्त्राचे ज्ञान मिळत असते.ज्ञानप्राप्तीमुळे आ-



पली वैचारिक पातळी वाढते आणि वैचारिक क्रांतीची सुरुवात होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की,आज या बंगाली भाषिक गावात झाडीपट्टीच्या रंगभूमीवर गाजलेल्या भुक या नाट्य प्रयोगाचे आयोजन करण्यात आले,नाटक अतिशय सुंदर आहे, भुक म्हणजे काय? भुक म्हणजे निव्वळ पोट भरण्यासाठी खाणे नव्हे तर जिद्द आणि चिकाटीची भुक उराशी बाळगा, भविष्यात मी डॉक्टर, इंजिनिअर, प्राध्यापक, एखाद्या प्रशासकीय अधिकारी, वैज्ञानिक होण्याची भुक आपल्यात रुजवा.त्या पेक्षाही मी या देशाचा सुज्ञ,तज्ञ, सुसंस्कृत सृजनशील व कर्तव्यदक्ष नागरिक घडणार व आपल्या गावाचे, तालुक्याचे, जिल्ह्याचे नावलौकिक करण्याची भुक उराशी बाळगा.असे आवाहन विचारमंचावरून केले.

या कार्यक्रमाला जि.प.सदस्या जयश्री देशमुख, अनिल देशमुख, पंचायत समिती सदस्य डॉ नाजुक कुंभरे, मुरलीधर ठाकरे, नाट्य दिग्दर्शक युवराज प्रधान, नाकाडे धान्य व्यापारी, मंडळाचे अध्यक्ष सचिव सर्व? सदस्य व परीसरातील नाट्य प्रेमी गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ठरले आता, अग्रवाल, रहांगडाले, पुराम लढविणार भाजपचा किल्ला

## पहिल्याच यादीत नाव जाहीर, महिनभरापासून सुरु असलेल्या चर्चांना लागला विराम

**गोंदिया:** भाजपने रविवारी (दि.२०) शंभर उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. यात गोंदिया जिल्ह्यातील गोंदिया, आमगाव, तिरोडा या तिन्ही मतदारसंघातील उमेदवार जाहीर केले आहेत. गोंदिया विधानसभा मतदारसंघात विनोद अग्रवाल, तिरोडा विजय रहांगडाले व आमगाव मतदारसंघातून संजय पुराम यांना उमेदवारी जाहीर केली आहे.

तर अर्जुनी मोरगाव मतदारसंघ महायुतीत राष्ट्रवादी काँग्रेसकडे राहणार असल्याने येथील उमेदवार उद्याप जाहीर व्हायचा आहे. भाजपच्या पहिल्याच यादीत तिन्ही अपेक्षित नावांचा समावेश असल्याने या मतदारसंघात भाजपकडून उमेदवारीसाठी सुरु असलेल्या नावांना आता विराम लागला आहे.

विधानसभा निवडणुका जाहीर झाल्यानंतर सर्वाच्या नजरा प्रमुख पक्षांकडून कुणाला उमेदवारी जाहीर केली जाते. याकडे लागल्या होत्या. जागा एक अन् इच्छुक अनेक असे चित्र असल्याने व या निवडणुकीत काही चेहरे बदलले जाणार अशी चर्चा होती, तर यासाठी काही इच्छुकांनी सुद्धा तयारी चालविली होती. त्यामुळे उमेदवारांच्या यादीबाबत सर्वांनाच उत्सुकता होती. रविवारी भाजपने पहिल्या शंभर उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. यात तिन्ही मतदारसंघात लावल्या जाणाऱ्या अंदाजानुसार उमेदवारांची घो–षणा झाली. गोंदिया विधानसभा मतदारसंघातून आ.विनोद अग्रवाल, तिरोडा मतदारसंघातून आ.विजय रहांगडाले तर आमगाव मतदारसंघातून माजी आ.संजय पुराम यांना उमेदवारी जाहीर झाली.

उमेदवारी जाहीर झाल्यानंतर त्यांच्या समर्थकांनी सोशल माध्यमांवर उमेदवारांचे फोटो टाकत पुन्हा गुलाल उधळायचे, अशी टॅग लाइन दिली. तर तिन्ही उमेदवारांनी आता फोकस विजयासाठी असणार असल्याचे सांगितले. हे तिन्ही उमेदवार २३ ऑक्टोबर रोजी उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याची माहिती आहे.





### आमगाव मतदारसंघात पुराम करणार का चमत्कार

**आमगाव विधानसभा मतदारसंघातून भाजपने माजी आ.संजय पुराम यांना पुन्हा संधी देणार, अशी चर्चा होती. त्या चर्चेला रविवारी उमेदवारी यादी जाहीर झाल्यानंतर पूर्णविराम लागला आहे. भाजपने सलग तिसऱ्यांदा त्यांना उमेदवारी दिली असूनते या संधीचे सोने करुन चमत्कार घडविणार काय, याकडे लक्ष असणार आहे.**

### आता नजरा महाविकास आघाडीच्या यादीकडे

**भाजपने रविवारी उमेदवारी यादी जाहीर केल्यानंतर जिल्ह्यातील तीन मतदारसंघातील भाजपचे उमेदवार ठरले. तर त्याविरोधात आता महाविकास आघाडी कुठले तगडे उमेदवार देणार यासाठी त्यांच्या यादीकडे लक्ष लागले आहे. काँग्रेसची यादी मंगळवार रात्री उशिरापर्यंत जाहीर होण्याची शक्यता आहे.**

### गोंदियात अग्रवाल विरुद्ध अग्रवाल

**भाजपने गोंदिया विधानसभा मतदारसंघात विद्यमान आ.विनोद अग्रवाल यांना उमेदवारी जाहीर केली आहे. तर काँग्रेसने या मतदारसंघातून माजी आ.गोपालदास अग्रवाल यांना उमेदवारी जाहीर केली असून त्याची केवळ औपचारिकता बाकी आहे. त्यामुळे या मतदारसंघात अग्रवाल विरुद्ध अग्रवाल असा सामना रंगणार आहे. दोन्ही उमेदवार तगडे असल्याने या मतदारसंघातील लढत ही चुरसपूर्ण होण्याची शक्यता आहे.**

### तिरोड्यात रहांगडाले साधणार का हॅट्रीक

**तिरोडा मतदारसंघातून भाजपने सलग तिसऱ्यांदा आ.विजय रहांगडाले यांच्यावर विश्वास व्यक्त करीत उमेदवारी जाहीर केली आहे. ही जागा भाजपसाठी सुद्धा प्रतिष्ठेची आहे. या निवडणुकीत विजय रहांगडाले हे विजयाची हॅट्रीक साधतात याकडे संपूर्ण लक्ष असणार आहे. महाविका आघाडी आता त्यांच्या विरुद्ध कोणता उमेदवार देणार यावर लढतीचे चित्र अवलंबून असणार आहे.**


# काँग्रेसने ११ वेळा, शिवसेनेने दोनदा राखला गड, तर अपक्षाला एकदाच संधी

## गोंदिया विधानसभा मतदारसंघ, शहरी भागाचा समावेश सर्वांचे असते लक्ष

**गोंदिया:** महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर पहिल्यांदाच विधानसभेपासून गोंदिया विधानसभा मतदारसंघ अस्तित्वात आला. या मतदारसंघाच्या स्थाप–नेपासून आतापर्यंत १४ सार्वत्रिक निवडणुका पार पडल्या आहेत. यात काँग्रेसने ११ वेळा तर दोनदा शिवसेनेने आणि गेल्या निवडणुकीत अपक्षाने विजय प्राप्त करुन या मतदारसंघात इतिहास रचला होता. त्यामुळेच हा मतदारसंघ काँग्रेसचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जा–तो. सन २०१९ च्या निवडणुकीत काँग्रेसचा हा बालेकिल्ला अपक्ष उमेदवाराने भेदला होता.

राज्यात पहिली विधानसभेची निवडणूक ही १९६२ मध्ये घेण्यात आली. १९६२ ते १९९० पर्यंत गोंदिया विधानसभा क्षेत्रावर काँग्रेसचे वर्चस्व होते. त्यानंतर १९९५ आणि १९९९ च्या निवडणुकीत काँग्रेसचा बालेकिल्ला भेदण्यास विरोधकांना यश आले. युतीच्या माध्यमातून शिवसेनेचे रमेश कुथे यांनी दोनदा या मतदारसंघातून विजय मिळविला होता. मात्र त्यानंतरच्या निवडणुकीत काँग्रेसने पुन्हा आपले वर्चस्व स्थापन केले. आतापर्यंत झालेल्या एकूण १४ निवडणुकापैकी ११ वेळा काँग्रेस तर दोन वेळा शिवसेनेला व एकदा अपक्ष उमेदवाराला गड सर करता आला आहे. या मतदारसंघात सन १९६७ पासून भारतीय जनसंघ, जनता पार्टी आणि आताचा भाजप पक्ष काँग्रेसला आव्हान देत आहेत. मात्र या मतदारसंघाचा इतिहास पाहता एकदाही भाजपच्या नावावर विजयाची नोंद नाही.

या विधानसभा क्षेत्राचे पहिले आमदार मनोहरभाई पटेल हे होते.




### बाजपेयी कुटूंबाकडे सर्वाधिक काळ नेतृत्व

**गोंदिया विधानसभा मतदारसंघाचे पहिले आमदार मनोहरभाई पटेल यांनी प्रज्ञा समाजवादी पार्टीचे गोपाल नारायण बाजपेयी यांच्यावर विजय मिळविला. त्यानंतरच्य दोन निवडणूका गोपाल नारायण बाजपेयी यांनी भाराँकाच्यावतीने लढवून विजय प्राप्त केला. १९७८ च्या निवडणुकीत राजकुमारी बाजपेयी यांनी निवडणूक लढविली. त्यानंतर त्या सलग तीनदा निवडून आल्या. एकंदरीत बाजपेयी कुटुंबाकडे सर्वाधिक २३ वर्षे या मतदारसंघाचे नेतृत्व राहिले आहे.**

### दोन आमदारांची हॅट्रिक

**गोंदिया विधानसभा मतदारसंघ अस्तित्वात आल्यानंतर या मतदारसंघावर सर्वाधिक काँग्रेसचे वर्चस्व राहिले आहे. आतापर्यंत दोन आमदारांनी या मतदारसंघातून तीनदा निवडून येत विजयाची हॅट्रिक केली आहे. यात राजकुमारी बाजपेयी यांनी १९७८ ते १९८५ पर्यंतच्या निवडणुकीत सलग विजय मिळविला. तर गोपालदास अग्रवाल यांनी २००४ ते २०१४ पर्यंतच्या निवडणुकीत सलग विजय प्राप्त करित हॅट्रिक केली होती.**

या विधानसभा क्षेत्रात भारतीय कम्युनिस्ट पार्टी, जनता दल या पक्षाच्या उमेदवारांना मतदारांनी बऱ्यापैकी कौल दिला पण त्यांनाही काँग्रेसच्या उमेदवाराला पराभूत करता आले नाही. त्यामुळेच गोंदिया विधानसभा क्षेत्र काँग्रेस पक्षाचा बालेकिल्ला म्हणून ओळ–खला जात होता. सन २०१९ च्या निवडणुकीत काँग्रेसचे गोपालदास अग्रवाल यांनी भाजपमध्ये प्रवेश करुन भाजपकडून निवडणूक लढविली होती. त्यांच्याविरुद्ध अपक्ष उमेदवार विनोद अग्रवाल हे रिंगणात होते.यात अपक्ष उमेदवार विनोद अग्रवाल यांनी भाजपचे उमेदवार गोपालदास अग्रवाल यांचा पराभव करुन विजय प्राप्त केला होता. या निवडणुकीत पुन्हा चित्र बदलले आहे. आमदार विनोद अग्रवाल हे भाजपकडून तर माजी आमदार गोपालदास अग्रवाल हे काँग्रेसकडून रिंगणात असणार आहेत. त्यामुळे या सामन्यात कुणाचा विजय होतो हे निकालानंतर कळेल.

# २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत कोणाला किती मते मिळाली

## एका जागेवर भाजप,एक अपक्ष, काँग्रेस व राष्ट्रवादीला प्रत्येकी एक जागा

**गंदिया:** गोंदिया जिल्ह्यात चार विधानसभा मतदारसंघ असून यातील आमगाव–देवरी विधानसता मतदारसंघाचा समावेश चिमुर–गडचिरोली लोकसभा मतदारसंघात होतो.तर गोंदिया, अर्जुनी मोरगाव व तिरोडा विधानसभा मतदारसंघ भंडारा–गोंदिया मतदारसंघात येतात.

आतापर्यंत भाजपचा गड मानल्या जाणाऱ्या गोंदिया जिल्ह्यात मागील निवडणुकीत खिंडार लावण्यात आघाडीला यश आले. कारण तीन जागा काबीज करणाऱ्या भाजपला मागील निवडणुकीत फक्त एकाच जागेवर समाधाना मानावे लागले. यामध्ये गोंदिया विधानसभा क्षेत्रात अपक्ष, अर्जुनी मोरगाव विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी, आमगाव विधानसभा मतदारसंघात काँग्रेस,तर तिरोडा विधानसभा मतदारसंघात भाजप उमेदवार निवडून आले.मागच्या निवडणूकीच्यावेळी वंचित आघाडी आणि बहुजन समाज पक्षाच्यावतीने उमेदवार रिंगणात उतरवल्याने काँग्रेस आघाडीला त्याच्या फटका सहन करावा लागला होता.

### असे होते विधानसभानिहाय चित्र

| विधानसभा | उमेदवार | किती मते | तेव्हाचा कोणता पक्ष |
|---|---|---|---|
| गोंदिया | विनोद अग्रवाल | १,०२,९९६ | अपक्ष |
| गोंदिया | गोपालदास अग्रवाल | ६७,०८७ | भाजप |
| गोंदिया | अमर वऱ्हाडे | ८,८६३ | काँग्रेस |
| अर्जुनी-मोरगाव | मनोहर चंद्रिकापुरे | ७१,९१२ | राष्ट्रवादी |
| अर्जुनी-मोरगाव | राजकुमार बडोले | ७१,९०६ | भाजप |
| अर्जुनी-मोरगाव | अजय लांजेवार | २५,३६२ | वंचित |
| तिरोडा | विजय रहांगडाले | ७६,४८२ | भाजप |
| तिरोडा | रविकांत बोपचे | ५०,५१९ | राष्ट्रवादी |
| तिरोडा | दिलीप बंसोड | ३३,९८३ | अपक्ष |
| आमगाव | सहषराम कोरोटे | ८८,२३५ | काँग्रेस |
| आमगाव | संजय पुराम | ८०,८४३ | भाजप |
| आमगाव | अमर पंधरे | २,५८३ | बसप |

### गेल्यावेळेस प्रत्येकाला एक–एक जागा



**जिल्ह्यात मागील निवडणुकीत अपक्ष उमेदवारासह भाजप, राष्ट्रवादी व काँग्रेसला एक–एक जागा मिळाली.यामध्ये गोंदिया विधानसभा मतदारसंघात अपक्ष उमेदवार विनोद अग्रवाल, तिरोडा मतदारसंघात भाजपचे विजय रहांगडाले, आमगाव मतदारसंघात काँग्रेसचे सहसराम कोरोटे, तर अर्जुनी मोरगाव मतदारंघातून राष्ट्रवादीचे मनोहर चंद्रीकापुरे निवडून आले आहेत.आता यातील विनोद अग्रवाल भाजपमध्ये परतले असून राष्ट्रवादीचे दोन गट झाल्याने चंद्रीकापुरे अजित पवार गटात आले आहेत.**

### सध्याच्या गणितानुसार पक्षनिहाय संख्या कशी?

| | |
|---|---|
| भाजप | १ |
| काँग्रेस | १ |
| राष्ट्रवादी | १ |
| अपक्ष | १ |

### माजी आमदार राजेंद्र जैन यांच्या प्रमुख उपस्थितीत शहर महिला राष्ट्रवादी कांग्रेसची बैठक

**गोंदिया :** गोंदिया शहर महिला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची बैठक राष्ट्रवादी काँग्रेस भवन, रेलटोली कार्यालय येथे माजी आमदार राजेंद्र जैन यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली. शहरातील प्रत्येक वॉर्डातील प्रत्येक बुथवर महिलांचे संघटन तयार करण्याबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली.

महिलांचे सक्षमीकरण व प्रगतीसाठी खा.श्री प्रफ्फुल पटेलजी यांच्या नेतृत्त्वात काम करणार असल्याचे महिलांनी मनोगत व्यक्त केले. बैठकीला राजेन्द्र जैन, नानू मुदलियार, माधुरी नासरे, आशा पाटिल, कुन्दा दोनोडे, रुचिता चौहान, संगीता माटे, पायल बग्गा, सुदर्शन वर्मा, चेतना पराते, लता रहांगडाले, शर्मिला पाल, वर्षा ठाकुर, उमा सिंग, पुस्तकला माने, अनिता चौरिवार, पंचशिला मेश्राम, आशा पिल्लारे, मनीषा चूटे, सुनीता सोनवाने, माधुरी परमार, लष्मी साहू, मनीषा साहू,सहित पदाधिकारी व कार्यकर्ता मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राज्यात ५७ वर्षांत फक्त १६१ महिला आमदार झाल्या

## आतापर्यंत १ हजार ५६ महिलांनी लढवली होती निवडणूक

**मुंबई:–** संपूर्ण दे–शात महाराष्ट्र राज्य पुरोगामी राज्य म्हणून ओळखले जाते. महिला सक्षमीकरणापासून “माझी लाडकी बहीण’ अशा विविध योजना राबवल्या जात आहेत. राज्याच्या मुख्य सचिवांपासून सचिव आणि मंत्रीपदासारख्या महत्त्वांच्या पदांवर सक्षम महिला विराजमान आहेत. पण तरीही राज्यात मागील ५७ वर्षांत झालेल्या विधानसभेच्या तेरा निवडणुकांमध्ये आतापर्यंत फक्त १६१ महिला आमदार निवडून आल्याची आकडेवारी पुढील महिन्यात होणाऱ्या विधानसभा निवडणुकांच्या निमित्ताने पुढे आली आहे.

राज्यात विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजले आहे. सध्याच्या चौदाव्या विधानसभेत २४ महिला आमदार आहेत. सध्याच्या आकडेवारीनुसार फक्त महिला आमदारांचे प्रमाण फक्त ८.३३ टक्के



आहे. यातील बहुतांश महिला आमदारांना राजकीय कौटुंबिक पार्श्वभूमी आहे. २०१९ मधील विधानसभा निवडणुकीत एपूण २३९ महिला निवडणूक रिंगणात होत्या. त्यापैकी १८९ महिलांचे डिपॉझिट जप्त झाले. मात्र २४ महिला निवडून आल्या. भाजपच्या आमदार मुक्ता टिळक यांचे २०२२ मध्ये दुर्दैवाने निधन झाले. त्यानंतर तीन वेगवेगळ?ा विधानसभा मतदारसंघांत झालेल्या पोटनिवडणुकीत तीन महिला आमदार निवडून आल्या. त्यामुळे महिला आमदारांची संख्या २६ झाली.

### १५ वर्षांत महिला आमदारांची संख्या वाढली

**मागील दहा वर्षांत झालेल्या विधानसभा निवडणकीमध्ये महिला आमदारांची संख्या वाढली आहे. २०१४ मध्ये एपूण २७७ महिला उमेदवार रिंगणात होत्या. त्यापैकी २० महिला आमदार निवडून आल्या, तर २००९ मध्ये २११ महिला उमेदवार रिंगणात होत्या. त्यापैकी ११ महिला आमदार निवडून आल्या. १९७२ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत एपूण ५६ महिला उमेदवार निवडणूक रिंगणात होत्या, पण त्या वर्षी एकही महिला आमदार निवडून आली नाही.**

# विधानसभा निवडणुकीत जिल्ह्यात भाजपसमोर तगडे आव्हान!

## जातिगत समीकरण व योग्य उमेदवार निवड ठरणार महत्वाचे

**गोंदिया:** – राज्यात विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजले असून २० नोव्हेंबर रोजी निवडणूक होणार आहे. निवडणुकीत यावर्षी प्रथमच मुख्य सात ते आठ पक्ष निवडणुकीच्या रिंगणात राहणार असल्याने कोण बाजी मारणार याची उत्सुकता सामान्य मतदाराला आहे. अश–ातच भाजपला आपले सातत्य राखण्यासाठी प्रत्येक जिल्हानिहाय मतदार संघावर करडी नजर ठेऊन सर्वसमावेशक उमेदवार निवड करणे आवश्यक असून गोंदिया जिल्ह्यातील चारही मतदार संघ आपल्या ताब्यात ठेवण्यासाठी भाजपला तगडे आव्हानाला सामोरे जावे लागणार आहे.

गोंदिया जिल्ह्यातील अर्जुनी म ोरगाव– सडक अर्जुनी मतदार संघ हा अनुसूचित जाती प्रवर्गासाठी राखीव आहे. मागील वेळी भाजपच्या वतीने कॅबिनेट मंत्री राहिलेल्या इंजी. राजकुमार बडोले यांचा राष्ट्रवादी काँग्रेसच्या नवख्या उमेदवार मनोहर चंद्रिकापुरे यांनी अल्पमताने पराभव केला. आता मात्र राज्यात पुलाखालून बरेच पाणी वाहून गेल्याने एकमेकांचे कट्टर विरोधक आता एकत्र असल्याची परिस्थिती पहावयास मिळत आहे. विद्यमान आमदार मनोहर चंद्रिकापुरे यांनी अजित पवार गटासोबत राहण्याच्या निर्णय घेतल्याने आता ते महायुतीमध्ये भाजप सोबत आहेत. महायुती मध्ये या मतदार संघात राष्ट्रवादी काँग्रेस व भाजपची ताकद बरी आहे. शिंदे शिवसेना फार प्रभावी नाही. त्यामुळे उमेदवार ठरवताना महायुतीच्या घटक पक्षांना नाकीनऊ येत आहे. अर्जुनी म ोरगाव मतदार संघात उमेदवारी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला मिळणार हे स्पष्ट झाल्याने भाजपचे माजी मंत्री इंजि.राजकुमार बडोले यांनी राष्ट्रवादीत प्रवेश केल्याने राजकीय समिकरण बदलले गेले आहेत.विद्यमान आमदार मनोहर चांद्रिकापुरे तसेच त्यांचे सुपुत्र सुगत चांद्रिकापुरे यांनी या मतदार संघावर आपला अधिकार दाखवीत कामाला सुरवात केली होती.मात्र राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांनी भाजप नेते इंजी.बडोलेंना पक्षात घेतल्याने विद्यमान आमदारांचा पत्ता कट झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

आता बडोलेंनी भाजपसोडून महायुतीच्या घटक पक्षात जरी प्रवेश केला असला तरी त्यांना त्यांच्या मतदारसंघातील भाजपचा व्होटबँक व कार्यकर्ते कशापध्दतीने सहकार्य करतात यावरही निकाल अवलंबून राहणार आहे.कारण महाविकास आघाडीकडून जवळपास माजी आमदार दिलीप बनसोड हे या मतदारसंघात काँग्रेसकडून उमेदवार असण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

देवरी – आमगाव – सालेकसा हा मतदार संघ अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी राखीव आहे. २०१४ मध्ये भाजपकडे असलेला हा मतदार संघ यावेळी २०१९ मध्ये काँग्रेसने आपल्याकडे खेचून आणला. या मतदार संघात महायुती व महाविकास आघाडीच्या सर्वच पक्षांचे मतदार असले तरी महायुतीत हा मतदार संघ भाजप कडे आहे. या मतदार संघात राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाची ही ताकद बऱ्या प्रमाणात आहे. त्यामुळे जागा वाटपात हा मतदार संघ कुणाला जाणार हे नंतर कळणार असले तरी महायुतीच्या दोन्ही पक्षांनी तयारी सुरू केलेली आहे. या मतदार संघात भाजपकडून माजी आमदार संजय पुराम यांना पहिल्याच यादीत स्थान मिळाल्याने भाजपमधील इतर इच्छुकांचा हिरमोड झालेला आहे.त्यातच त्यांना मतदार स्वीकारतील की नाही हा प्रश्नच आहे. २०१४ मध्ये आमदार होण्यापूर्वी त्यांच्या पत्नी या जिल्हा परिषदेच्या सभापती होत्या.

२०१९ मध्ये त्यांचा पराभव झाला. त्यानंतर पुन्हा त्यांनी आपल्या धर्मपत्नी सविता पुराम यांच्यासाठी जिल्हा परिषदेची उमेदवारीआणून विजय मिळवून पुन्हा जिल्हा परिषद सभापतीची माळ गळ्यात घातली. त्यामुळे आलटून पालटून सत्ता त्यांच्याच हातात असल्याने इतर पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी नाराजीचा सूर आवळला आहे. भाजपने जर नव्या चेहऱ्यावर विश्वास दाखविला तर निश्चितच त्याचा फायदा भाजपला होणार, यात काही शंका नाही.राष्ट्रवादी काँग्रेस किती पुराम यांना पुर्णविराम देण्याकरीता पुढाकार घेते त्यावरच सर्व अवलंबून आहे.

तिरोडा – गोरेगाव मतदार संघ हा भाजपचा परंपरागत गढ राहिलेला मतदार संघ आहे. या मतदार संघात ओबीसी मते सर्वाधिक असल्याने भाजपनेही या मतदार संघात ओबीसी उमेदव–ाराला व त्यातही पोवार समाजाच्या उमेदवाराला प्राधान्य दिले आहे. या मतदार संघात भाजपने दोन वेळा सलग विजय मिळविला आहे. भाजपला आताही विजयाचा आत्म विर्श्वास आहे. मात्र तो अतिआत्म विश्वास ठरू नये याची काळजी मात्र पक्षाला घ्यावी लागेल. या मतदार संघात महायुतीच्या घटक पक्षापैकी सर्वाधिक ताकद ही भाजपची आहे, यात काही शंका नाही. या मतदार संघाचे नेतृत्व भाजपचे विद्यमान आमदार विजय रहांगडाले मागील दहा वर्षांपासून करीत आहेत. यावेळीही पक्षाने त्यांनी तिसऱ्यांदा रिंगणात उतरवले असून त्यांच्या विजयाकरीता भाजपचे सर्व पदाधिकारी कामाला लागल्याचे चित्र दिसून येत आहे.

भाजप अनेकदा चेहरा बदलवते मात्र यावेळी भाजपने या मतदार संघात भाजपचे युवा मोर्चा अध्यक्ष ओम कटरे, जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले, जिल्हा परिषद बांधकाम सभापती संजय टेंभरे,या नवख्यांना मात्र निवडणूक लढण्यास इच्छुक असतांना संधी नाकारली आहे.

भाजप आमदार विजय रहांगडाले यांनी विकास कामे केली असली तरी काही भागातील रस्त्यांची समस्या त्यांच्यासाठी डोकेदुखी ठरली आहे. त्यातही त्यांना अँटी इनकमबन्सी फॅक्टर चा फटका ही बसण्याची चिन्हे आहेत. त्यामुळे या हक्काच्या जागेवर भाजपला सूक्ष्म नियोजन करणे गरजेचे ठरेल.

महाविकास आघाडीकडून ही जागा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाला निश्चित झाली असून रविंकात बोपचे उमेदवार असणार निश्चित झाले आहे.आमदार रहांगडालेंच्या तुलनेत रविकांत बोपचे यांचा राजकीय डावपेचात अनुभव कमी असल्याने ते कशापद्तीने या निवडणूकीला सामोरे जातात हे सुध्दा बघावे लागणार आहे.



गोंदिया जिल्ह्यातील सर्वात महत्वाचा मतदार संघ म्हणजे गोंदिया विधानसभा मतदार संघ. केंद्रीय मंत्री राहिलेले प्रफुल्ल पटेल यांचा गृह मतदार संघ. या मतदार संघात राज्यात ज्या काही नाट्यमय घडामोडी झाल्या त्याची पुनरावृत्ती ही पहावयास मिळत आहे. मागील वेळी विरो–धात असलेली राष्ट्रवादी यावेळी राष्ट्रवादी (अजित पवार गट) च्या रुपणेत भाजप सोबत आहे. या मतदार संघात सर्वाधिक ताकद ही भाजपची आहे. त्या पाठोपाठ राष्ट्रवादी अजित पवार गटाची ताकद या मतदार संघात पहावयास मिळते. शिंदे शिवसेना ही थोड्या फार प्रमाणात असल्याचे जाणवते. भाजपने यावेळी मागील विधानसभा निवडणुकीत अपक्ष निवडून आलेले आमदार विनोद अग्रवाल यांना आपल्याकडे वळवून त्यांचे व त्यांच्या सहकाऱ्यांचे निलंबन रद्द केले आहे. उपमुख्यमंत्री फडणवीस व भाजप प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांच्या उपस्थितीत झालेल्या मेळाव्यात गोंदिया विधानसभेला अपक्ष आमदार विनोद अग्रवाल हेच महायुतीचे उमेदवार असल्याचे पहिल्याच यादीत जाहीर केले आहे. त्यामुळे या मतदार संघात ओबीसी मतदारांमध्ये असलेली नाराजी भाजप साठी डोकेदुखी ठरू शकते.

या मतदार संघात सर्वाधिक मते ही पोवार समाजाची, त्यांनतर कुणबी समाजाची असल्याचे बोलले जाते. दोन्ही समाज ओबीसी प्रवर्गात मोडत असल्याने इतर कोणत्याही पक्षाकडून किंवा तगडा अपक्ष ओबीसी उमेदवार रिंगणात उतरला तर मात्र भाजपला याठिकाणी नेहमीप्रमाणे ही जागा अडचणीची ठरू शकते.

गोंदिया विधानसभा निवडणुकीत यावेळी जिल्हा परिषदेच्या एका पदाधिकाऱ्याने निवडणूक लढणार असल्याचे सूतोवाच केले असल्याने त्याचा फटका महविकास आघाडी पेक्षा महायुतीला जास्त बसणार असल्याचे जाणवत आहे.

एकंदरीत हॉट सीट ठरत असलेल्या या जागेवर भाजपने संयमाने व जनभावना ठेवून पावले उचलली तर पहिल्यांदा कमळ फुलण्यास कोणीही रोखू शकणार नाही.एकंदरीत राज्यात भाजपला सत्तेत जायचे असेल तर जिल्ह्यात ही भाजपला तगड्या आव्हानाचा सामना करीत योग्य उमेदवारांना उमेदवारी देण्याचे नियोजन करावे लागणार आहे. तेव्हाच कुठे भाजपला सत्तेची फळे चाखण्यास मिळतील.

# अट्टल दुचाकी चोरटे पोलिसांच्या जाळ्यात;तब्बल ४३ दुचाकी जप्त



गोंदिया : जिल्ह्यात दुचाकी चोरीच्या घटनांमध्ये मोठी झाली आहे. चोरट्यांची टोळी सक्रिय असल्याचे बोलले जात होते. त्यातच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कारवाई करून अट्टल दुचाकी चोरट्यांना उमरेड जि. नागपूर येथून जेरबंद करण्यात यश मिळविले. चोरट्याकडून सुमारे ३० लाख ४० हजार रूपये किंमतीच्या ४३ दुचाकी जप्त करण्यात आल्या. ही कारवाई २० ऑक्टोबरला करण्यात आली. विक्की वसंता रामटेके (२७) रा. मंगळवारी पेठ उमरेड जि. नागपूर व विक्रम रामेश्वर उके (४२) रा. नारायण नगर उमरेड असे अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

सविस्तर असे की, जिल्ह्यात मोटारसायकल चोरीच्या घटनांमध्ये वाढ झालेली आहे. जिल्ह्या–तील सर्व पोलिस ठाणे हद्दीत चोरटे दुचाकींवर डोळा ठेवून लंपास करीत असल्याच्या तक्रारी नोंद होत आहेत. या अनुसंगाने पोलिस तपासकामी होते. वाढत्या दुचाकीच्या चोरीच्या घटनांवर लगाम लावून चोरट्याच्या मुसक्या आवळण्यासाठी गुन्हे शाखेचे वेगवे–गळी पथके तयार करून चोरट्यांचा शोध घेतला जात होता. गोपनीय माहिती संकलीत करणे, जिल्हा व जिल्ह्या बाहेरील गुन्हेगारांची माहिती काढून त्यांचे हालचालीवर बारीक लक्ष ठेवणे, तांत्रीक स्वरुप–ातील बाबी व गुन्हेगारांचा अभिलेख पडताळणी करून करण्यात आली. समांतर तपासामध्ये तिरोडा पोलिस स्टेशनमध्ये दाखल गुन्ह्यात विक्की वसंता रामटेके व विक्रम रामेश्वर उके या दोन्ही आरोपींचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले. यावरून गुन्हे शाखेच्या पोलिसांनी उमरेड गाठून दोन्ही आरोपींना ताब्यात घेतले.

दरम्यान त्यांची कसून चौकशी केली असता मुख्य आरोपी विक्की वसंता रामटेके याने तिरोडा हद्दीतील वडेगाव, नवेझरी, एकोडी तसेच जिल्हा भंडारा, चंद्रपूर, नागपूर आदि ठिकाणाहून दुचाकी चोरी केल्याचे सांगितले. तसेच चोरीच्या दुचाकीवर असलेले प्रत्यक्ष नंबर प्लेट बदलवून बनावट आर.सी.तयार करून लोकांना विक्री केल्याची कबुली दिली. यावरून पोलिसांनी दोन्ही आरोपींना अटक करून त्यांच्याकडून ११ लाख ४० हजार रूपये किंमतीच्या १८ मोटारसायकल जप्त केल्या. दोन्ही आरोपींना तिरोडा पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.